

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक ३०७ * नांदेड * गुरूवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरमध्येच होणार

७ ते १८ डिसेंबर दरम्यान दोन आठवड्यांचे अधिवेशन

मुंबई (प्रतिनिधी)- राज्य विधिमंडळाचे यंदाचे हिवाळी अधिवेशन ७ ते १८ डिसेंबर या कालावधीत नागपूर येथे होणार आहे. बुधवारी विधानभवनात झालेल्या विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशनाच्या कालावधीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, जलसंधारणाची कामे आणि शेतकऱ्यांना मदत या मुद्द्यांवर अधिवेशनात चर्चा होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर विदर्भाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून काही विशेष घोषणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



या बैठकीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषद सभापती राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधानपरिषद उपसभापती सचिन अहिर, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह सर्वपक्षीय प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला. राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून पाणीटंचाईचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

जलसंधारणाच्या कामांसाठी मंजूर करण्यात आलेला निधी, दुष्काळी उपाययोजना आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारकडून करण्यात येणारी मदत या विषयांवर विरोधकांकडून सरकारला जाब विचारला जाण्याची शक्यता आहे. विदर्भाचा अनुशेष, विकासकामांसाठी निधी आणि प्रलंबित प्रश्न यांवरही अधिवेशनात चर्चा अपेक्षित आहे. याशिवाय कर्जतमधील वृक्षतोड आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विकासकामांचे मुद्देही चर्चेत येण्याची शक्यता आहे.

झारखंडमधील एनटीपीसी प्रकल्पात कन्व्हेयर बेल्टचा सांगाडा कोसळला, ३ कामगारांचा जागीच मृत्यू

चतरा (प्रतिनिधी)- झारखंडमधील चतरा जिल्ह्यातील टंडवा येथे असलेल्या राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळाच्या प्रकल्पात बुधवारी एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण दुर्घटना घडली आहे. प्रकल्पातील बांधकाम सुरू असलेल्या कन्व्हेयर बेल्टचा लोखंडी सांगाडा अचानक तुटून खाली कोसळल्याने ३ कामगारांचा जागीच मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत अन्य १ कामगार गंभीर जखमी झाला असून, ढिगाऱ्याखाली आणखी काही कामगार अडकले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही भयंकर दुर्घटना एनटीपीसी प्रकल्पातील 'सीएचपी जेएच-१' या ठिकाणी घडली. या ठिकाणी कन्व्हेयर बेल्ट उभारणीचे काम वेगाने सुरू होते आणि अनेक कामगार सांगाड्यावर चढून काम करत होते. मात्र, अचानक या सांगाड्याचा मुख्य भाग तुटला आणि संपूर्ण सांगाडा क्षणात खाली कोसळला. सांगाडा कोसळताच त्यावर काम करणारे कामगार खाली पडून ढिगाऱ्याखाली दबले गेले. या दुर्घटनेनंतर संपूर्ण प्रकल्प परिसरात एकच गोंधळ आणि आरडाओरड सुरू झाली.

या अपघाताची माहिती मिळताच प्रकल्प व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाची धावपळ उडाली. चतरा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अनिमेष मैथानी यांनी या दुर्घटनेत ३ कामगारांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला आहे. घटनेची माहिती मिळताच टंडवा पोलीस ठाण्याचे प्रभारी विपिन कुमार आपल्या पोलीस पथकासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सध्या पोलीस आणि प्रशासनाच्या पथकाकडून युद्धपातळीवर मदत व बचावकार्य सुरू आहे.

व्यापाऱ्यांना आंदोलनाविरुद्ध संघर्षाचा अधिकार; सर्वोच्च न्यायालयाची काँग्रेस, आपसह 'कॉक्रोच जनता पार्टी'ला नोटीस

नवी दिल्ली (प्रतिनिधी)- आंदोलनाचा हक्क विरुद्ध सर्वसामान्यांचा जगण्याचा आणि व्यवसायाचा अधिकार, असा नवा संघर्ष आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. दिल्लीतील रामलीला मैदानाला आंदोलनाचे ठिकाण म्हणून घोषित करण्याच्या निर्णयाविरोधात व्यापारी संघटनांनी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने या प्रकरणी केंद्र व दिल्ली सरकारसह काँग्रेस, आम आदमी पक्ष, अभिजीत दिपकेंची 'कॉक्रोच जनता पार्टी' आणि 'ऑल इंडिया स्टुडंट्स युनियन' (आयसा) यांना नोटीस बजावून उत्तर मागवले आहे.

दिल्लीतील 'किराणा कमिटी' आणि चावडी बाजारातील 'दिल्ली आयर्न अँड हार्डवेअर मर्चंट्स असोसिएशन' या व्यापारी संघटनांनी १६ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली होती. सीजेपीने कॅनॉट प्लेस



येथे 'लेहरा दो तिरंगा' मोर्चाची हाक दिली होती, ज्यात आयसा देखील सहभागी होणार होती. या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची पुढील सुनावणी दोन आठवड्यांनंतर ठेवली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयात बाजू मांडली. रामलीला मैदान हे कॅनॉट प्लेस, चांदणी चौक, चावडी बाजार, खारी बावली आणि सदर बाजार यांसारख्या अत्यंत गजबजलेल्या आणि प्रमुख बाजारपेठांच्या अगदी जवळ आहे. सभोवताली दाट लोकवस्तीचा भाग आहे. असे असताना, नागरिक आणि व्यवसायावर होणाऱ्या परिणामांचा कोणताही अभ्यास न करता हे मैदान आंदोलनासाठी राखीव ठेवण्यात आले आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला. दिल्ली पोलिसांनी ११ ऑक्टोबर रोजी रामलीला मैदान हे आंदोलन करण्यासाठी ठिकाण म्हणून जाहीर केले होते. हा आदेश रद्द करून सर्व घटकांच्या हिताचा विचार करून नव्याने आढावा घेण्यात यावा, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे.

कुलगामच्या मास्टरमाइंडला कंठस्नान, लश्कर कमांडर लतीफ भट्ट चकमकीत ठार

श्रीनगर (प्रतिनिधी)- जम्मू आणि काश्मीरमधील कुलगाम येथे सुरक्षा दलांनी एका चकमकीत लश्कर-ए-तोयबाचा कमांडर लतीफ अहमद भट याला ठार केले आहे.



बुधवारी पहाटे कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. यादरम्यान, सैनिकांनी लतीफला घेरले आणि आत्मसमर्पण करण्यास सांगितले. मशिदीत लपून बसलेल्या लतीफ भटने आत्मसमर्पण करण्यास नकार दिल्यानंतर तो चकमकीत ठार झाला. तो सीआरपीएफच्या चौकीवरील हल्ल्यात सामील होता आणि त्याचा शोध सुरू होता. अशातच सुरक्षा दलाने त्याला कंठस्नान घालत मोठी कारवाई केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरक्षा दलांनी बुधवारी शोधमोहीम सुरू केली होती. दरम्यान, सुरक्षा दलाचा एका दहशतवाद्याशी सामना झाला. मंगळवारी रात्री उशिरा गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी परिसरात घेराबंदी आणि शोधमोहीम सुरू केली. त्यानंतर, बुधवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास जंगलपोरा परिसरात गोळीबार झाला.

भारत आणि न्यूझीलंडमधील पहिल्या कसोटीला आजपासून सुरुवात

मुंबई (प्रतिनिधी)- टी-२० आणि एकदिवसीय मालिकेत बाजी मारल्यानंतर भारतीय संघ आता न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकेसाठी सज्ज झाला आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला आज, गुरुवार १९ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेत भारतीय संघात अनेक महत्त्वाचे बदल पाहायला मिळणार आहेत. शुभमन गिल आणि केएल राहुल यांचे संघात पुनरागमन होणार असून, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहही मैदानात उतरणार आहे.

कापसात गांजा, तुरीत नशा! माहूर तालुक्यातील गांजा शेतीचा पर्दाफाश, ४४ लाखांचा मुद्देमाल जप्त

दोन भावांचा गांजाचा धंदा उघड; ११८ झाडांसह ८८ किलो गांजा जप्त -एलसीबीची कारवाई

नांदेड (प्रतिनिधी)- माहूर तालुक्यातील दहेगाव येथे बेकायदेशीररीत्या लागवड केलेला आणि साठवून ठेवलेला एकूण ८८ किलो २८० ग्रॅम गांजा (एकूण किंमत ४४ लाख १४ हजार) जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांचे पथक पेट्रोलिंग करत असताना मिळालेल्या गुप्त माहिती की, दहेगाव (ता. माहूर) येथील शेतशिवारात कापूस आणि तुरीच्या पिकात अवैधपणे गांजाची लागवड करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे राजपत्रित अधिकारी तथा नायब तहसीलदार, शासकीय पंच, वजन-मापे तज्ञ आणि फॉरेन्सिक टीमसह पोलीस पथकाने दहेगाव शिवारातील शेत गट क्रमांक ८५ मध्ये छापा टाकला. या कारवाईत शेतात लागवड केलेली लहान-मोठी एकूण ११८ हिरवी गांजाची झाडे, ज्यांचे एकूण वजन ८४ किलो ८६० ग्रॅम आहे. एका पांढऱ्या नायलॉनच्या पोत्यात भरून ठेवलेला सुकलेला गांजा, ज्याचे वजन ३ किलो ४२० ग्रॅम आहे. असा एकूण ८८ किलो २८० ग्रॅम वजनाचा गांजा, ज्याची एकूण किंमत ४४ लाख १४ हजार रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर शेत हे तुकाराम राघोजी कन्हाळे (वय ७० वर्षे, व्यवसाय शेती, रा. दहेगाव, ता. माहूर, जि. नांदेड) आणि सिताराम राघोजी कन्हाळे (वय ७५ वर्षे, व्यवसाय शेती, रा. दहेगाव, ता. माहूर, जि. नांदेड) या आरोपींच्या मालकीचे असून त्यांनी संगनमताने ही बेकायदेशीर लागवड केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी माहूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरीलकारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव, अर्चना पाटील, स्थागुशाचे पोनि अतुल भोसले, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, पोउपनि मिलिंद सोनकांबळे, पोउपनि बळीराम दासरे, पोलीस अंमलदार ज्ञानोबा कवठेकर, रविशंकर बामणे, देविदास चव्हाण, सिद्धार्थ सोनसळे, मोतीराम पवार, अझरोद्दीन शेख, अनिल बिरादार, शुभम श्रीभाते यांच्या पथकाने पार पाडली.

नांदेडमध्ये आजपासून रंगणार मराठी नाट्य स्पर्धेचा महाउत्सव!

६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचा आज शुभारंभ; ३ डिसेंबरपर्यंत नाट्यप्रयोगांची मेजवानी

नांदेड (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला आज, गुरुवार दि. १९ नोव्हेंबरपासून नांदेड येथे सुरुवात होत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून नांदेडकर रसिकांना सलग १२ दिवस मराठी रंगभूमीवरील विविध विषयांवरील दर्जेदार नाट्यप्रयोगांची मेजवानी अनुभवायला मिळणार आहे.

नांदेड येथील नाट्यप्रेमींना १९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ७ वाजता विविध नाट्यसंस्थांचे प्रयोग पाहण्याची संधी मिळणार आहे. राज्यातील हौशी रंगभूमीला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देणे आणि मराठी नाट्यपरंपरेचा समृद्ध वारसा पुढे नेणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे.

या स्पर्धेत नांदेड व परभणी जिल्ह्यांतील विविध नाट्यसंस्था सहभागी होत असून, विविध विषय, आशय आणि नाट्यप्रकारांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे. आज १९ नोव्हेंबर, गुरुवार रोजी 'अस्तोदय' सादरकर्ता : झपुर्दा सोशल फाउंडेशन, परभणी, २० नोव्हेंबर, शुक्रवार रोजी 'जेनवेव सादरकर्ता : तन्मय ग्रुप, नांदेड, २१ नोव्हेंबर, शनिवार रोजी 'गर्भ' सादरकर्ता : स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेड, २३ नोव्हेंबर, सोमवार रोजी 'कुंपण पलीकडले' सादरकर्ता : लीला आर्ट्स फाउंडेशन नांदेड, २४ नोव्हेंबर, मंगळवार रोजी 'भयरात्र' सादरकर्ता : राजीव गांधी युवा फोरम, परभणी, २५ नोव्हेंबर, बुधवार रोजी 'अकल्पित स्मृती' सदरकर्ता : ओम प्रतिष्ठान, परभणी, २६ नोव्हेंबर, गुरुवार रोजी 'बंड्या तुमच्या उरावर' सादरकर्ता : नाट्यनाद बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेड, २७ नोव्हेंबर, शुक्रवार रोजी 'नटसम्राट' सादरकर्ता : ज्ञान विज्ञान विकास शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड, ३० नोव्हेंबर, सोमवार रोजी 'सहज सुचलं म्हणून' सादरकर्ता : अष्टविनायक कला क्रीडा व सेवा प्रतिष्ठान, परभणी, १ डिसेंबर, मंगळवार रोजी 'मीना' सादरकर्ता : शिवशंभो बीज प्रतिष्ठान, नांदेड, २ डिसेंबर, बुधवार रोजी 'द्विगत' सादरकर्ता : बालगंधर्व सांस्कृतिक कला क्रीडा व युवक मंडळ, परभणी, ३ डिसेंबर, गुरुवार रोजी 'एका तळ्यात होती' सादरकर्ता : क्रांती हुतात्मा चॅरिटेबल ट्रस्ट, परभणी ही नाटके सादर होणार आहेत.

ही सर्व नाटके डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नांदेड येथे दररोज सायंकाळी ७ वाजता होणार असून यासाठी शासनातर्फे फक्त रुपये १५ व रुपये १० असे तिकीट आकारण्यात आलेले आहे. नांदेडकर रसिकांसाठी ही केवळ नाट्यस्पर्धा नसून मराठी रंगभूमीचा कलाविष्कार अनुभवण्याची एक अनोखी पर्वणी ठरणार आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई उद्या कंधारमध्ये!

कंधारमधील १०० खाटांच्या मॉडेल रुग्णालयासह कोट्यवधींच्या विकासकामांचे लोकार्पण; हजारोंच्या उपस्थितीत होणार जाहीर सभा



नांदेड (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार ह्या उद्या दि. २० नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात कंधार येथील विविध विकासकामांचे त्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात येणार असून, श्री शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर आयोजित जाहीर सभेलाही त्या संबोधित करणार आहेत. या सभेला सुमारे २० हजार नागरिक उपस्थित राहतील, असा विश्वास आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कंधार- लोहा विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यावर विशेष प्रेम होते. त्यांच्या पुढाकारातून या भागातील विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला होता. त्यांच्या निधनानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे काम उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वातून होत असल्याचे आमदार चिखलीकर यांनी सांगितले. सुनेत्रा पवार ह्या उपमुख्यमंत्री झाल्या तेव्हापासून नांदेड जिल्ह्यात हा त्यांचा तिसरा दौरा असल्याचेही त्यांनी सांगितले.

कंधार येथे १०० खाटांचे अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात आले असून, महाराष्ट्रातील मॉडेल रुग्णालय म्हणून विकसित होण्याच्या दृष्टीने येथे विविध आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या रुग्णालयात एकूण ६९ पदांना मंजुरी देण्यात आली असून सर्व सोयी युक्त हे रुग्णालय कंधारच्या सेवेसाठी सज्ज झाले आहे. या रुग्णालयाचे लोकार्पण सुनेत्रा पवार यांच्या हस्ते होणार आहे.


याशिवाय कंधार नगर परिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या शांतिदूत गोविंदराव चिखलीकर उद्यानाचेही लोकार्पण करण्यात येणार आहे. या उद्यानाच्या विकासासाठी पाच कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. येथे मुलांसाठी खेळण्याची साधने, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळ्याची व्यवस्था तसेच अन्य सुविधांची निर्मिती करण्यात आली आहे. हे गार्डन नांदेड जिल्ह्यात सर्वोत्तम असल्याचे चिखलीकर यांनी सांगितले.

कंधार- लोहा विधानसभा मतदारसंघातील प्रशासकीय कामकाजाला गती मिळावी, यासाठी दोन कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या तहसील कार्यालयाच्या वरील माळ्यावर बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीचेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे.

या सर्व विकासकामांच्या लोकार्पणानंतर शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर २० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार असून, उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यावेळी उपस्थितांना संबोधित करणार आहेत.

या कार्यक्रमाला राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, राज्य मंत्री बाबासाहेब पाटील, राज्य मंत्री मेघना बोर्डीकर आणि सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले उपस्थित राहणार आहेत. याशिवाय नांदेड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि खासदारांनाही कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, प्रदेश सरचिटणीस दिलीपराव धर्माधिकारी, प्रवीण पाटील चिखलीकर, जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, माजी आमदार मोहन हंबर्डे, महानगर कार्याध्यक्ष माधव पावडे, शिरीष गोरठेकर, डॉ. उत्तम सोनकांबळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



नांदेडमध्ये गुन्हेगारांची 'सफाई'! खंडणी, घरफोडी आणि गोवंश तस्करी टोळ्यांतील १२ सराईत गुन्हेगार जिल्ह्यातून तडीपार

नांदेड (प्रतिनिधी)- नांदेड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि मालमत्तेविरुद्धच्या व इतर गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी डॉ. निलाभ रोहन यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ अन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करून, भाग्यनगर आणि धर्माबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३ वेगवेगळ्या टोळ्यांतील एकूण १२ सराईत गुन्हेगारांना नांदेड जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार (तडीपार) करण्याचे आदेश पारित केले आहेत.

सदर टोळ्यांतील सदस्यांवर दाखल असलेले गंभीर गुन्हे आणि त्यांच्यावर यापूर्वी करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक कारवायांचा त्यांच्या वर्तणुकीवर कोणताही परिणाम होत नसल्याचे दिसून आले होते. संबंधित उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालानंतर पोलीस अधीक्षकांनी ही कठोर कारवाई केली आहे.

या कारवाईत शिला सुनिल भद्रगे (वय ४२ वर्षे, रा. बेलानगर, नांदेड), इंदुबाई मुंजाजी बारटे (वय ३५ वर्षे, रा. संतोषनगर, नांदेड), आमन मारोती कांबळे (वय २० वर्षे, रा. पालीनगर, नांदेड), रेखा आनंद पुरी (वय ३५ वर्षे, रा. विजयनगर, नांदेड), सुनिता रमाकांत सोनकांबळे (वय ४० वर्षे, रा. सप्तगिरीनगर, नांदेड), अर्जुन पुरुषोत्तम मोरे (वय २८ वर्षे, रा. मरघाट, नांदेड), सोहेल पि. अब्दुल सत्तार (वय १९ वर्षे, रा. जवाहरनगर, नांदेड), प्रदीपकुमार विरेंद्रकुमार कौरी (वय २० वर्षे, रा. बळीरामपूर, नांदेड), आशा हरिचंद्र तेलंग (वय ५५ वर्षे, रा. शाहूनगर, नांदेड), शेख नईम शेख मैनोदीन (वय २१ वर्षे, रा. कैलासनगर, नांदेड), अजीम गौसोद्दीन खुरेशी (वय ४० वर्षे, रा. करखेली, ता. धर्माबाद, जि. नांदेड), दत्ता किशन शिलगिरे (वय ३८ वर्षे, रा. करखेली, ता. धर्माबाद, जि. नांदेड) या १२ जणांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन म्हणाले, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या आणि वारंवार गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई सुरूच राहणार असून, सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असे म्हणाले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

न्यायालयाचा दणका, ट्रम्प यांच्या मनमानीला लगाम!

अमेरिका ही जगातील अनेक देशांतील विद्यार्थ्यांसाठी स्वप्नभूमी आहे. त्या स्वप्नपूर्तीसाठी हजारो विद्यार्थी कठोर परिश्रम, आर्थिक गुंतवणूक आणि वर्षानुवर्षांचे नियोजन करतात. प्रशासनाच्या एका निर्णयामुळे त्यांचे भविष्य अनिश्चित होऊ शकते. त्यामुळे न्यायालयाने अशा प्रस्तावाला कायद्याच्या कसोटीवर तपासून रद्द करणे ही जगभरातील विद्यार्थ्यांसाठी आश्वासक बाब आहे. अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने परदेशी विद्यार्थी, संशोधक आणि पत्रकारांच्या व्हिसा मुक्कामावर निर्बंध घालण्याचा घेतलेला निर्णय फेडरल न्यायालयाने रद्द केला, ही केवळ अमेरिकेतील स्थलांतर धोरणाशी संबंधित घटना नाही; तर लोकशाही व्यवस्थेतील न्यायपालिकेच्या स्वायत्ततेचा, कायद्याच्या राज्याचा आणि मानवी स्वातंत्र्याचा महत्त्वपूर्ण विजय आहे. ट्रम्प यांच्या मनमानी कारभाराला न्यायालयाने घातलेला हा लगाम जगभरातील विद्यार्थी, संशोधक, पत्रकार आणि शिक्षण क्षेत्रासाठी दिलासादायक ठरला आहे. या निर्णयाचे जगभरातून स्वागत होणे स्वाभाविक आहे. अमेरिकेच्या डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने जुलैमध्ये परदेशी विद्यार्थ्यांना चार वर्षांपेक्षा अधिक काळ अमेरिकेत राहण्यासाठी केंद्र सरकारची विशेष परवानगी घेणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्याचबरोबर परदेशी पत्रकारांच्या मुक्कामावरही मर्यादा आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. पत्रकारांचा अमेरिकेतील मुक्काम काही वर्षांऐवजी २४० दिवसांपर्यंत, तर चिनी पत्रकारांसाठी केवळ ९० दिवसांपर्यंत मर्यादित करण्याचा प्रस्ताव होता. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर किंवा अभ्यासोत्तर प्रशिक्षण संपल्यानंतर देश सोडण्यासाठी मिळणारा ६० दिवसांचा कालावधी कमी करून ३० दिवस करण्याचीही योजना होती. अशा निर्णयांमुळे परदेशी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यावर, संशोधनाच्या सातत्यावर, विद्यापीठांच्या कामकाजावर आणि पत्रकारांच्या स्वतंत्र वृत्तांकनावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. अमेरिकेच्या विद्यापीठांमध्ये जगभरातून विद्यार्थी उच्च शिक्षण, संशोधन आणि नव्या ज्ञानाच्या निर्मितीसाठी येतात. त्यांच्या वास्तव्यावर अनावश्यक निर्बंध घालणे म्हणजे शिक्षणाच्या संधींवरच गदा आणण्यासारखे आहे. बोस्टन येथील फेडरल न्यायालयाचे न्यायाधीश एफ. डेनिस सेलर यांनी सोमवारी हा प्रस्ताव रद्द करताना ट्रम्प प्रशासनाचा निर्णय 'मनमानी, अविवेकी, अधिकारांचा गैरवापर करणारा आणि कायद्याशी विसंगत' असल्याचे स्पष्ट केले. परदेशी विद्यार्थ्यांना अमेरिकेत शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याची जी भूमिका काँग्रेसने स्वीकारली आहे, त्याच संधी रोखण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. विद्यार्थ्यांच्या व्हिसा कार्यक्रमाला कमजोर करण्यासाठी गृह सुरक्षा विभागाला कायद्याने इतके व्यापक अधिकार दिलेले नाहीत, असेही न्यायाधीशांनी स्पष्ट केले. लोकशाही व्यवस्थेत सरकारला धोरणे आखण्याचा अधिकार असतो; परंतु तो अधिकार अमर्याद नसतो. राष्ट्राध्यक्ष कितीही शक्तिशाली असले, तरी त्यांना कायद्याच्या चौकटीत राहूनच निर्णय घ्यावे लागतात. प्रशासनाच्या निर्णयामुळे नागरिकांचे अथवा परदेशी व्यक्तींचे अधिकार बाधित होत असतील, तर न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. अमेरिकेच्या न्यायालयाने या प्रकरणात नेमकी हीच भूमिका घेतली आहे. त्यामुळे हा निर्णय ट्रम्प यांच्या वैयक्तिक राजकीय इच्छेपेक्षा संविधानिक मूल्ये आणि कायद्याचे वर्चस्व अधिक महत्त्वाचे असल्याचा संदेश देणारा आहे. अमेरिकेतील शिक्षणसंस्थांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांची मोठी संख्या आहे. उच्च शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विविध नव्या क्षेत्रांत भारतीय विद्यार्थी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. व्हिसा मुक्कामावर कठोर मर्यादा आल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करणे, संशोधन प्रकल्पांना वेळ देणे, इंटर्नशिप किंवा अभ्यासोत्तर प्रशिक्षण घेणे आणि रोजगाराच्या संधी शोधणे यामध्ये अडचणी निर्माण झाल्या असत्या. भारतीय वंशाच्या नागरिकांसह भारतातील विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठीही न्यायालयाचा हा निर्णय आनंदाची बातमी आहे. अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी लाखो रुपये खर्च करून जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर अनिश्चिततेची तलवार लटकणे योग्य नाही. शिक्षण ही केवळ व्यावसायिक पदवी मिळवण्याची प्रक्रिया नसून ज्ञान, कौशल्य, संशोधन आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रवास आहे. हा प्रवास सरकारी नियमांच्या अनिश्चिततेमुळे मध्येच खंडित होऊ नये. परदेशी पत्रकारांच्या मुक्कामावर मर्यादा घालण्याच्या प्रस्तावामुळे आंतरराष्ट्रीय पत्रकारितेच्या स्वातंत्र्याबाबतही चिंता निर्माण झाली होती. अमेरिकेसारख्या लोकशाही देशात जगभरातील घडामोडींवर वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना अल्पकालीन व्हिसाच्या मर्यादेत काम करावे लागले असते, तर त्याचा परिणाम बातम्यांच्या गुणवत्तेवर, सातत्यावर आणि स्वतंत्र पत्रकारितेवर झाला असता. पत्रकारांना देशातील घडामोडी समजून घेण्यासाठी, विविध स्रोतांशी संवाद साधण्यासाठी आणि सखोल वृत्तांकन करण्यासाठी पुरेसा वेळ आवश्यक असतो. प्रशासनाच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, सत्तेतील व्यक्तींच्या कारभाराचे परीक्षण करणे आणि जनतेसमोर सत्य मांडणे हे पत्रकारितेचे मूलभूत कर्तव्य आहे. पत्रकारांच्या कामावर अनावश्यक बंधने घालणे हे अप्रत्यक्षपणे अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने आणण्यासारखे ठरू शकते. न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे या चिंतेलाही दिलासा मिळाला आहे. अमेरिकेतील या निर्णयाचे भारतातील विद्यार्थी संघटना, शिक्षण क्षेत्र, संशोधक आणि भारतीय वंशाच्या नागरिकांनी स्वागत केले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे हित जपण्यासाठी न्यायालयाने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मत विविध संघटनांनी व्यक्त केले. अमेरिकेतील विद्यापीठे, संशोधन संस्था आणि विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राच्या भवितव्यासाठीही हा निर्णय सकारात्मक असल्याचे मानले जात आहे. ट्रम्प प्रशासनाने स्थलांतर नियंत्रण, राष्ट्रीय सुरक्षेचे मुद्दे आणि अमेरिकन नागरिकांच्या हिताचे कारण पुढे करून अनेक कठोर धोरणे राबविण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय हिताचे रक्षण करणे प्रत्येक सरकारचे कर्तव्य असले, तरी त्यासाठी परदेशी विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि पत्रकारांना अनावश्यक त्रास देणे योग्य नाही. अमेरिकेच्या विकासात परदेशी नागरिकांनीही मोठे योगदान दिले आहे. विज्ञान, वैद्यकीय क्षेत्र, तंत्रज्ञान, उद्योग, अर्थव्यवस्था आणि संशोधनात आंतरराष्ट्रीय प्रतिभेचा सहभाग अमेरिकेच्या प्रगतीचा महत्त्वाचा आधार राहिला आहे. ट्रम्प यांच्या निर्णयांवर न्यायालयाने यापूर्वीही अनेकदा कायदेशीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणातही न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रशासनाला कायद्याने दिलेल्या अधिकारांचा वापर करताना मनमानी करता येणार नाही. राष्ट्राध्यक्षांच्या अधिकारांना मर्यादा आहेत आणि त्या मर्यादा ओलांडल्या गेल्यास न्यायपालिका हस्तक्षेप करू शकते. अमेरिकेच्या न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे केवळ व्हिसा नियमांवरील विजय नाही, तर लोकशाही मूल्ये, कायद्याचे राज्य, शिक्षणाचे स्वातंत्र्य आणि मानवी अधिकार यांचा विजय आहे. सत्ताधाऱ्यांच्या मनमानीला न्यायालयीन अंकुश बसला की सामान्य नागरिकांपासून जगभरातील विद्यार्थ्यांपर्यंत अनेकांना दिलासा मिळतो. ट्रम्प प्रशासनाच्या या प्रस्तावाला न्यायालयाने दिलेला दणका म्हणूनच जगभरात आनंदाने स्वागतार्ह ठरला आहे. सत्तेपेक्षा संविधान मोठे, व्यक्तीपेक्षा कायदा मोठा आणि मनमानीपेक्षा न्याय मोठा, हा संदेश या निर्णयाने पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

राष्ट्रीय एकात्मता : राष्ट्राच्या सामर्थ्याचा आणि प्रगतीचा आधार



भारत हा विविधतेने नटलेला आणि सांस्कृतिक समृद्धीचा वारसा लाभलेला देश आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या एका भागातील भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती आणि परंपरा दुसऱ्या भागापेक्षा वेगळ्या असल्या, तरी या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे भारतीयत्वाची भावना होय. ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात देशाविषयी आपलेपणा, परस्परांविषयी आदर, सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक जबाबदारी निर्माण करते. विविधतेचा स्वीकार करून एकतेची भावना जपणे, प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेचा सन्मान करणे आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ राजकीय किंवा भौगोलिक संकल्पना नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक आणि वैचारिक पातळीवर विकसित होणारी व्यापक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी १९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना विविधतेतील एकतेची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे देशातील सर्व नागरिकांनी आपापली स्वतंत्र ओळख विसरून एकसारखे जीवन जगणे नव्हे. प्रत्येकाला आपली भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा जपण्याचे स्वातंत्र्य असतानाच इतरांच्या वेगळेपणाचा आदर करण्याची मानसिकता विकसित होणे म्हणजे खरी राष्ट्रीय एकात्मता होय. विविधतेचे अस्तित्व मान्य करून त्यातून परस्पर विश्वास, सहकार्य, बंधुभाव आणि समान राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे हे तिचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या कोणत्याही भागातील नागरिकाला इतर प्रदेशातील नागरिक परका वाटू नये, तर सर्वजण एका व्यापक राष्ट्रीय कुटुंबाचे घटक आहेत, अशी भावना निर्माण झाली पाहिजे. ही भावना केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी व्यक्त होऊन चालणार नाही, तर दैनंदिन सामाजिक व्यवहारातही तिचे प्रतिबिंब दिसले पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासामध्ये राष्ट्रीय एकात्मतेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशातील विविध जाती, धर्म, भाषा आणि प्रदेशांतील नागरिक एकत्र आले होते. त्यांची सामाजिक पार्श्वभूमी आणि जीवनपद्धती वेगवेगळी असली, तरी परकीय सत्तेपासून मुक्त होऊन स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचे ध्येय समान होते. स्वातंत्र्यलढ्याने भारतीय समाजाला त्याग, सहकार्य, सामूहिक संघर्ष आणि देशप्रेमाची शिकवण दिली. या संघर्षामध्ये विविध समाजघटकांनी दिलेले योगदान भारतीय राष्ट्रीयत्वाच्या जडणघडणीसाठी महत्त्वपूर्ण ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशासमोर राष्ट्रीय अखंडता टिकविणे, लोकशाही व्यवस्था मजबूत करणे, सामाजिक विषमता दूर करणे आणि सर्वसमावेशक विकास साधणे ही आव्हाने होती. या सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची भावना अत्यावश्यक ठरली.

भारतीय संविधान हा राष्ट्रीय एकात्मतेचा सर्वांत महत्त्वाचा आधार आहे. संविधानाच्या उद्देशिकेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना विशेष स्थान देण्यात आले आहे. ही मूल्ये भारतीय लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांबरोबरच राष्ट्रीय एकात्मतेची दिशादर्शक तत्त्वे आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायामुळे प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळते. विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपासना यांचे स्वातंत्र्य व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे रक्षण करते. कायद्यापुढील समानता नागरिकांमधील भेदभावाला प्रतिबंध करते, तर बंधुतेची भावना व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व अखंडता टिकविण्यास मदत करते. त्यामुळे संविधानाचे पालन करणे, संविधानिक संस्थांचा आदर करणे आणि लोकशाही मूल्यांचे आचरण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. संविधानातील मूल्ये केवळ शासकीय व्यवस्था किंवा न्यायालयीन प्रक्रियेपुरती मर्यादित न राहता ती समाजाच्या सामूहिक जीवनात रुजली पाहिजेत.

राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी प्रादेशिक समतोल आणि सर्वसमावेशक विकासालाही विशेष महत्त्व आहे. भारतातील विविध राज्ये आणि प्रदेश नैसर्गिक साधनसंपत्ती, भौगोलिक परिस्थिती, औद्योगिक विकास, शेती, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी या बाबतीत वेगवेगळ्या स्थितीत आहेत. काही प्रदेशांमध्ये वेगाने विकास होत असताना काही भागांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम, डोंगराळ आणि सीमावर्ती भागांतील नागरिकांना शिक्षण, आरोग्य, वाहतूक, पिण्याचे पाणी आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होत नाहीत. विकासातील ही विषमता दूर करण्यासाठी सर्व प्रदेशांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे. स्थानिक गरजांनुसार विकासाचे नियोजन, पायाभूत सुविधांची उभारणी, रोजगारनिर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्यसेवांचा विस्तार यांमधून प्रादेशिक असमतोल कमी करता येतो. एखाद्या प्रदेशाचा विकास म्हणजे संपूर्ण देशाचा विकास, ही जाणीव प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे.

शिक्षण हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्यांची रुजवण होते. शाळा आणि महाविद्यालये ही केवळ ज्ञानप्राप्तीची केंद्रे नसून सामाजिक समरसता आणि जबाबदार नागरिकत्व घडविण्याची महत्त्वपूर्ण ठिकाणे आहेत. विविध जाती, धर्म, भाषा आणि आर्थिक स्तरांतील विद्यार्थी एकत्र शिकतात, खेळतात आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. या प्रक्रियेत त्यांच्यामध्ये परस्पर सहकार्य, मैत्री आणि समानतेची भावना विकसित होते. अभ्यासक्रमामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढा, संविधानिक मूल्ये, सामाजिक सुधारणा, विविध भारतीय संस्कृती, लोकशाही आणि मानवी हक्क यांचा समावेश असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षाभिमुख ज्ञान न देता जबाबदार नागरिकत्वाची जाणीव करून दिली पाहिजे. राष्ट्रीय सण, संविधान दिन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि आंतरराज्यीय विद्यार्थी देवाणघेवाण यांच्या माध्यमातून एकात्मतेची भावना अधिक दृढ करता येते.

राष्ट्रीय एकात्मतेमध्ये कला, साहित्य, संगीत, क्रीडा आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. भारतातील लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत, नाट्यपरंपरा आणि साहित्य यांमधून विविध समाजघटकांच्या जीवनाचे दर्शन घडते. महाराष्ट्रातील लावणी, पोवाडा, भारूड आणि आदिवासी नृत्यपरंपरा जशा सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहेत, तसेच देशातील इतर प्रदेशांतील कला आणि परंपराही राष्ट्रीय संस्कृतीला समृद्ध करतात. साहित्यिक आणि सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धा, युवक महोत्सव आणि आंतरराज्यीय सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून विविधतेतील एकतेचा अनुभव घेता येतो. क्रीडा क्षेत्रामध्ये भाषिक, धार्मिक आणि प्रादेशिक भेद बाजूला ठेवून खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतात. भारतीय संघाच्या विजयात प्रत्येक नागरिकाला आनंद होतो, कारण त्या क्षणी वैयक्तिक आणि प्रादेशिक ओळखीपेक्षा राष्ट्रीय ओळख अधिक महत्त्वाची ठरते. अशा अनुभवांमुळे सामूहिक अभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होते.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्येही राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये खोलवर रुजलेली आहेत. संतपरंपरेने समता, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यातून समता, शिक्षण, न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित झाले. महाराष्ट्रातील विविध जाती, धर्म, भाषा आणि सांस्कृतिक समूहांनी एकत्रितपणे सामाजिक जीवन समृद्ध केले आहे. राज्याच्या ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत विविध प्रदेशांतील लोक रोजगार, शिक्षण आणि व्यवसायाच्या निमित्ताने एकत्र राहतात. या सहअस्तित्वाला परस्पर आदर, सामाजिक सहकार्य आणि समान संधींची जोड मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची परंपरा राष्ट्रीय एकात्मतेच्या व्यापक ध्येयाला प्रेरणा देणारी आहे.

१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा राष्ट्रीय एकात्मता दिन हा भारतीय समाजाला विविधतेतील एकतेची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. या दिवसाचा खरा संदेश केवळ राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यापुरता मर्यादित न राहता तो आपल्या विचारांत, वर्तनात आणि सामाजिक व्यवहारात प्रतिबिंबित झाला पाहिजे. कोणत्याही व्यक्तीची ओळख तिच्या जाती, धर्म, भाषा किंवा प्रदेशावरून ठरविण्याऐवजी तिच्या माणूसपणाला आणि कर्तृत्वाला महत्त्व दिले पाहिजे. देशातील प्रत्येक नागरिकाला समान सन्मान, सुरक्षितता, न्याय आणि विकासाची संधी मिळणे हीच सशक्त राष्ट्राची खरी ओळख आहे. आपापल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे जतन करताना परस्परांच्या अस्तित्वाचा आदर करणे, मतभिन्नतेतून संवाद साधणे आणि सामूहिक हिताला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक भारतीयाची सामूहिक बांधिलकी आहे. विविधतेचा स्वीकार, सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता, भाषिक आदर, बंधुभाव आणि संविधाननिष्ठा या मूल्यांच्या आधारावरच विकसित, शांततापूर्ण आणि समृद्ध भारताची निर्मिती होऊ शकते. म्हणूनच 'विविधता ही आपली शक्ती आणि एकात्मता ही आपली ओळख' हा विचार प्रत्येक भारतीयाच्या मनात रुजला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेच्या बळावरच भारताची लोकशाही अधिक सुदृढ होईल आणि भावी पिढ्यांसाठी न्याय्य, समताधिष्ठित, सुरक्षित व प्रगत राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न साकार होईल.

–डॉ. राजेंद्र बगाटे,
हिंगोली

भारतीय इतिहासात अजरामर झालेल्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाई

हिंदबांधवा ! थांब या स्थळी
अश्रु दोन ढाळी।
ती पराक्रमाची ज्योत
मावळे इथे झांशीवाली ।।

कवी भा.रा. तांबे यांची ही कविता वाचल्यावर कोणाच्याही अंगात वीरश्री संचारावी आणि मस्तक त्या विरांगणाच्या असामान्य पराक्रमापुढे नतमस्तक व्हावे अशा राणी लक्ष्मीबाई यांचा १९ नोव्हेंबर हा जन्मदिन. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे बंधु चिमाजी अप्पा यांचे व्यवस्थापक मोरोपंत तांबे व भागिरथीबाई या दाम्पत्याच्या पोटी कार्तिक वद्य १४, शके १७५७ म्हणजे इंग्रजी कालगणनेनुसार १९ नोव्हेंबर १८३५ ला लक्ष्मीबाई यांचा जन्म झाला. मोरोपंतांनी तिचे नाव 'मनुताई' ठेवले. मनुताई रूपाने देखणी व हुशार होती. मनुताई ३-४ वर्षांची असतांनाच तिच्यावर मातृवियोगाचे दु:ख कोसळले. ती पुढे ब्रह्मावर्त येथे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या आश्रयास गेली. ब्रह्मावर्ता येथील वाड्यात नानासाहेबपेशवे आपले बंधुरावसाहेबयांच्यासह तलवार, दांडपट्टा व बंदुक चालवणे त्याचप्रमाणे घोडदौडीचे शिक्षण घेत असत. त्यांच्यासोबत राहून मनुताईनेही हे युद्धकलेचे शिक्षण घेऊन त्यातील पेच आत्मसात् केले. मोडी अक्षर ओळख आणि लेखन-वाचन मनुताईने त्यांच्यासमवेत शिकून घेतले. वयाच्या ७ व्या वर्षी शके १७६४ च्या वैशाखात म्हणजेच १८४२ साली मनुताई यांचा विवाह झाशी संस्थानचे अधिपति गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी थाटामाटात पार पडला. मोरोपंत तांबे यांच्या मनुताई विवाहित होऊन झाशीची राणी म्हणून संबोधल्या जाऊ लागल्या. विवाहानंतर त्यांचे नाव 'लक्ष्मीबाई' असे ठेवण्यात आले.

इ.स. १८५१ मध्ये मार्गशीर्ष शु.



एकादशीला राणी लक्ष्मीबाई यांच्या पोटी एक पुत्ररत्न जन्मले. गादीला वारस मिळाला म्हणून गंगाधररावांना अत्यानंद झाला. तो तीन महिन्यांचा असतांनाच काळाने त्याच्यावर झडप घातली. त्यामुळे राणी लक्ष्मीबाई व गंगाधरराव यांना पुत्रवियोगाचे दु:ख सोसावे लागले.पुत्रवियोगाचा धक्का सहन न झाल्याने प्रकृति खंगलेले गंगाधरराव काही महिन्यांतच संग्रहणीच्या विकारास बळी पडले. गंगाधररावांच्या इच्छेनुसार गादीला वारस म्हणून नेवाळकर घराण्याच्या वंशातील वासुदेव नेवाळकर यांचा मुलगा आनंदराव दत्तक घेऊन त्याचे नाव 'दामोदरराव' ठेवले. दत्तक विधि झाल्यानंतर २१ नोव्हेंबर १८५३ रोजी दुपारी गंगाधररावांना मृत्यूने गाठले. पतिवियोगाच्या माध्यमातून वयाच्या १८ व्या वर्षी राणी लक्ष्मीबाई यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. ७ मार्च १८५४ रोजी इंग्रजांनी एक राजघोषणा प्रसिद्ध करून झाशीचे संस्थान खालसा केले. राणी लक्ष्मीबाई या अन्यायामुळे जळफळत असतांनाच इंग्रज अधिकारी मेजर एलिस लक्ष्मीबाई यांना भेटण्यासाठी आला. त्याने झाशी संस्थान संपुष्टात आणले गेल्याची राजघोषणा वाचून दाखवली. संतापलेल्या राणी लक्ष्मीबाई यांच्याकडे एलिसने परत जाण्याची अनुज्ञा मागताच चवताळलेल्या वाघिणीप्रमाणे त्या म्हणाल्या, 'मेरी झाशी नही दूँगी!', हे ऐकून एलिस निघून गेला.१८५७ मधील जानेवारीत सुरू झालेल्या स्वातंत्र्य युद्धाने १० मे रोजी मीरत येथेही पेट घेतला.

मीरतबरोबरच दिल्ली, बरेली पाठोपाठ झाशीही इंग्रजांच्या राजवटीतून स्वतंत्र झाली. झाशीतील इंग्रजांची सत्ता संपुष्टात आल्यावर राणी लक्ष्मीबाई यांनी ३ वर्षांनंतर तेथील सूत्रे हाती घेतली. त्यानंतर त्यांनी इंग्रजांच्या संभाव्य हल्ल्यातून झाशीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने सिद्धता केली. इंग्रजांनी लक्ष्मीबाई यांना जिवंत पकडून आणण्यासाठी सर ह्यू रोज यांची नेमणूक केली. २० मार्च १८५८ रोजी सर ह्यू रोज यांच्या सैन्याने झाशीपासून ३ मैलांवर आपल्या सैन्याचा तळ ठोकला व लक्ष्मीबाई यांना शरणागति पत्करावी, असा निरोप पाठवला; मात्र शरणागति न पत्करता त्यांनी स्वत: झाशीच्या तटावर उभ्या राहून सैनाला लढण्यास स्फुर्ति देण्यास सुरुवात केली. लढाई सुरू झाली, झाशीच्या तोफा इंग्रजांची दाणादाण उडवू लागल्या. ३ दिवस सतत लढाई करूनही झाशीच्या किल्ल्यावर तोफा डागता येत नसल्याने सर ह्यू रोजने फितुरीचा मार्ग अवलंबला. अखेर ३ एप्रिल रोजी सर ह्यू रोजच्या सैन्याने झाशीत प्रवेश केला. सैन्याने झाशीतील लोकांची लुटालूट करण्यास सुरुवात केली. बालेकिल्ल्यातून राणी लक्ष्मीबाई यांनी शत्रूची फळी तोडून पेशव्यांस जाऊन मिळण्याचे ठरवले. रात्री निवडक २०० स्वारांनिशी आपल्या १२ वर्षांच्या दामोदरास पाठीशी बांधून 'जय शंकर' असा जयघोष करून लक्ष्मीबाई या किल्ल्याबाहेर पडल्या. इंग्रजांचा पहारा तोडून काल्पीच्या दिशेने त्यांनी मजल मारली. या दरम्यान वडील मोरोपंत त्यांच्या समवेत होते. फळी तोडून बाहेर जातांना इंग्रजांच्या फौजांबरोबर झालेल्या हातघाईच्या लढाईत ते घायाळ झाले. इंग्रजांनी त्यांना पकडले आणि फाशी दिले. सतत २४ तास घोड्यावरची रपेट करून १०२ मैल अंतर कापून राणी काल्पीस जाऊन पोहोचल्या. पेशव्यांनी सर्व परिस्थिती ओळखून राणी लक्ष्मीबाई यांना सर्व मदत करण्याचे ठरवले. लढाईसाठी मागितली तेवढी पथके तिच्या स्वाधीन केली. २२ मे रोजी सर ह्यू रोजने काल्पीवर हल्ला चढवला. युद्ध सुरू झालेले पाहून लक्ष्मीबाई यांनी हातात तलवार परजीत विजेच्या चपळाईने आघाडीकडे धाव घेतली. त्यांच्या या हल्ल्याने इंग्रजी सैन्याची पिछेहाट झाली. या पराभवाने दिङ्मूढ झालेल्या सर ह्यू रोजने राखीव उंटांचे दल रणभूमीवर आणले. नव्या दमाचे सैन्य येताच क्रांतिकारकांचा आवेश कमी झाला. २४ मे रोजी काल्पी इंग्रजांनी ताब्यात घेतली. काल्पी येथे पराभूत झालेले रावसाहेब पेशवे, बांद्याचे नबाब, तात्या टोपे, झाशीची राणी आणि प्रमुख सरदार गोपाळपूर येथे एकत्र जमले. लक्ष्मीबाई यांनी ग्वाल्हेर हस्तगत करण्याची सूचना केली. ग्वाल्हेरचे शिंदे अजूनही ब्रिटिशधार्जिणे होते.

राणी लक्ष्मीबाई यांनी पुढे होऊन ग्वाल्हेर जिंकून पेशव्यांच्या हातात दिले. ग्वाल्हेरवरील विजयाचे वृत्त सर ह्यू रोजला कळले होते. वेळेचा अपव्यय केल्यास आपली परिस्थिति अवघड होईल, हे त्याच्या लक्षात आले. त्याने आपल्या सैन्याचा मोर्चा ग्वाल्हेरकडे वळवला. १६ जून रोजी सर ह्यू रोज हा ग्वाल्हेरला भिडला. सर ह्यू रोज यांचा लक्ष्मीबाई व पेशवे यांनी मुकाबला करण्याचे ठरवले. ग्वाल्हेरच्या पूर्व बाजूचे रक्षण करण्याचे काम लक्ष्मीबाई यांनी स्वत:च्या अंगावर घेतले. लढाईत लक्ष्मीबाई यांचे अभूतपूर्व धैर्य पाहून सैनिकांना स्फुर्ति आली. त्यांच्या मंदार आणि काशी या दासीसुद्धा पुरुषी वेषात लढाईसाठी आल्या. राणीच्या शौर्यामुळे इंग्रजांना त्या दिवशी माघार घ्यावी लागली.

१८ जूनला राणी लक्ष्मीबाई यांच्या शौर्यामुळे हताश झालेल्या इंग्रजांनी ग्वाल्हेरवर सर्व बाजूंनी एकदम हल्ला केला. या वेळी त्यांनी शरणागती न पत्करता शत्रूची फळी फोडून बाहेर जाण्याचे ठरवले. फळी फोडून जात असतांना फुलबागेचा एक ओढा आडवा आला. राणी लक्ष्मीबाई यांच्याकडे नेहमीचा 'राजरत्न' घोडा नसल्याने दुसरा घोडा ओढ्यापाशीच गरगर फिरू लागला. राणी लक्ष्मीबाई यांनी आपले भवितव्य ओळखून चालून आलेल्या गोर्यांवर हल्ला केला. यात त्या रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या. पुरुषी वेशात असल्यामुळे राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज स्वार ओळखू शकले नाहीत. त्या पडताच ते स्वार परत निघून गेले. राणी लक्ष्मीबाई यांच्या एकनिष्ठ सेवकांनी जवळच असलेल्या गंगादास यांच्या मठात नेऊन त्यांच्या मुखात गंगोदक घातले. आपल्या देहास म्लेंच्छांचा हात लागू नये, अशी इच्छा प्रदर्शित करून त्यांनी वीर मरण स्वीकारले. जगभर पसरलेल्या क्रांतिकारकांना, सरदार भगतसिंग यांच्या संघटनेला आणि सरतेशेवटी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या सेनेला याच झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या शौर्याने स्फुर्ती दिली. हिंदुस्थानच्या अनेक पिढ्यांना स्फुर्ती देत झाशीच्या राणी अवघ्या तेविसाव्या वर्षी स्वातंत्र्यसंग्रामात अमर झाल्या. अशा वीरांगना झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या चरणी शतश: प्रणाम.

– जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

महानगरात दीपावली धुरात, तर दरेगावात विचारमंथनात!

ज्ञानदीप आणि जलदीपाची दीपावली समजून घेण्याची गरज -अनिल मोरे



नांदेड (प्रतिनिधी)- राज्यभर आणि देशभर दीपावली फटाक्यांच्या धुरात साजरी होत असताना, दरेगाव येथे प्रा. डॉ. हनुमंत भोपाळे यांच्या संकल्पनेतून गेल्या एकोणतीस वर्षांपासून विचारांची आणि ज्ञानाची दीपावली साजरी होत आहे. इथे प्रदूषण करणारे फटाके फोडले जात नाहीत, तर ज्ञानाचे फटाके फोडून वैचारिक प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न होतो. ही कौतुकास्पद कामगिरी आहे. हा ज्ञानोत्सव केवळ देशानेच नव्हे, तर जगाने समजून घेण्याची गरज आहे. अशा विधायक उपक्रमाला साथ देणारी माणसे वाढली, तर हा विचार गावागावांत पोहोचेल. त्यासाठी समाजाने याचा विचार करायला हवा, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालयाचे माजी सहसचिव तथा 'झुंज तुझी माझी' या चित्रपटाचे अभिनेते एकनाथ ऊर्फ अनिल मोरे यांनी केले.

दरेगाव येथे गेल्या एकोणतीस वर्षांपासून सुरू असलेल्या 'ज्ञानदीपाची दीपावली' या उपक्रमात ते बोलत होते. विचारपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक शिवा कांबळे, महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, शिराढोण्याचे माजी सरपंच प्राचार्य खुशाल पाटील, माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव कपाळे, दलितमित्र माधवराव पवार पाटील काटकळंबेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना एकनाथ मोरे यांनी इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियामध्ये आलेल्या बातम्यांचा संदर्भ दिला. ते म्हणाले, दूरचित्रवाणी वाहिन्यांवरून आणि वर्तमानपत्रांतून दिवाळीतील फटाक्यांच्या दुष्परिणामांच्या बातम्या सतत समोर येत आहेत. प्रकाश, ऊर्जा आणि आनंदाचा सण असलेली दिवाळी आज बेदरकार फटाकेबाजीमुळे काळवंडली आहे. फटाक्यांमुळे राज्यभरात आगीच्या शेकडो घटना घडल्या. मुंबई उच्च न्यायालयाने सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवण्यास मनाई केलेली असतानाही आतषबाजीला लगाम बसलेला नाही. लक्ष्मीपूजनाच्या रात्री मुंबई, पुणे, नागपूरसह अनेक शहरे धुराने झाकून गेली होती. देशाची राजधानी दिल्लीत गेल्या पाच वर्षांतील सर्वाधिक प्रदूषित दिवसाची नोंद झाली. जगातील सर्वाधिक प्रदूषित शंभर शहरांपैकी तब्बल त्राण्णव शहरे भारतातील असल्याचे समोर आले आहे. ज्या दिव्यांनी अंधार दूर करायचा, त्याच सणात आपण हवा, पाणी आणि आरोग्य यांचा अंधार ओढवून घेत आहोत. आनंद साजरा करण्याची आपली पद्धतच आपल्याला घातक ठरू लागली आहे.

म्हणूनच दरेगावची ज्ञानदीपाची दीपावली आणि जलदीपाची दीपावली समजून घेण्याची आज खरी गरज आहे. एकीकडे शहरे धुरात गुदमरत असताना, दरेगावसारख्या छोट्या गावातून गेली एकोणतीस वर्षे ज्ञानाचा दिवा तेवत ठेवला जात आहे आणि आता त्याला पाणी अडवण्याच्या जलदीपाची जोड मिळाली आहे. दिवाळीत फटाक्यांचा धूर नव्हे, तर विचारांचा प्रकाश आणि पाण्याची समृद्धी निर्माण करता येते, हे दरेगावने दाखवून दिले आहे. ही दीपावली नेमकी काय आहे, ती कशी साजरी होते आणि तिचा हेतू काय आहे, हे जनतेने समजून घेतले, तरच या चळवळी गावागावांत पोहोचतील आणि तिथे राबवल्या जातील, असेही ते म्हणाले.

या प्रसंगी बोलताना माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव कपाळे म्हणाले, ज्ञानासारखे पवित्र दुसरे काहीही नाही, असे आपली संस्कृती सांगते. ज्ञानाची दीपावली हा संस्कृतीरक्षणाचा आणि मानवजातीच्या रक्षणाचा भाग आहे. कारण इथे मानवजातीबरोबरच प्राणिमात्रांच्याही भवितव्याची चर्चा होते. ज्ञानदीपाच्या दीपावलीबरोबरच डॉ. हनुमंत भोपाळे जलदीपाची दीपावली साजरी करतात आणि अखिल भूतमात्रांची काळजी कशी घ्यावी, याचा संदेश देण्याचा प्रयत्न करतात. हा प्रयत्न अतिशय कौतुकास्पद आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे म्हणाले, अंतःकरणात सामाजिक कळवळा जिवंत असेल, तरच असे विधायक उपक्रम राबवले जातात. स्वार्थाने आंधळ्या झालेल्या माणसांना हा उपक्रम कळणार नाही, कारण तो गेली एकोणतीस वर्षे त्यागातून सुरू आहे. ज्याला ज्ञानाची गोडी लागलेली असते, तोच माणूस असे उपक्रम राबवत असतो. म्हणून जगातील ज्ञानी व्यक्तींना माझे आवाहन आहे की, हा उपक्रम गावागावांत नेण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत.

महाराष्ट्र शासनाचा दलितमित्र पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माधवराव पवार पाटील काटकळंबेकर यांनी हा उपक्रम चांगला असून त्याला समाजाने प्रोत्साहन द्यावे, असे नम्र आवाहन केले. या प्रसंगी ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालयाचे माजी सहसचिव एकनाथ ऊर्फ अनिल मोरे यांना मानपत्र, ग्रंथ आणि शाल देऊन २०२६ च्या राष्ट्रीय ज्ञानदीप पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच सर्वाधिक पदव्या प्राप्त केल्याबद्दल डॉ. गोविंद नांदेडे यांना राष्ट्रीय ज्ञानदीप जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

नांदेड येथे देशमुख-मराठा वधूवर परिचय मेळावा उत्साहात संपन्न



नांदेड (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील मराठा- देशमुख समाजाचा वधू-वर परिचय मेळावा विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालय पिंपळगाव नांदेड येथे रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी उत्साहात संपन्न झाला.

मेळाव्यासाठी अध्यक्ष म्हणून राजेसाहेब देशमुख माकेगावकर यांना तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. नम्रता देशमुख तरोडेकर यांना निमंत्रित करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांना माल्यार्पण तसेच दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. डॉ. सुधीर देशमुख यांचे हस्ते परिचय मेळाव्यानिमित्त छापलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तिकेत विवाहोत्सुक ८५ वधू आणि १४० वरांचा समावेश आहे.

याप्रसंगी उद्घाटनपर भाषणात राजेसाहेब माकेगावकर म्हणाले, मराठा समाजाचे कर्तृत्व मोठे आहे, हा समाज सर्वांना सोबत घेऊन चालणारा आहे. विभक्त कुटुंबामुळे समाजातील मुला-मुलींचे विवाह जुळण्यास उशीर होत आहे. एकत्र कुटुंबातील एकोपा महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी याप्रसंगी नमूद केले.

डॉ. सुधीर देशमुख यांनी यावेळी परिचय मेळावा आयोजित करणाऱ्या सर्व सदस्यांचे सामाजिक कार्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल, समाजासाठी वेळ दिल्याबद्दल अभिनंदन केले.

यावेळी डॉ. नम्रता तरोडेकर यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमात उपवर वधू-वरांनी आपापला परिचय उपस्थितांना करून दिला. जे वधू-वर उपस्थित राहु शकले नाहीत त्यांच्या पालकांनी त्यांच्या मुला-मुलीचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष देशमुख चिकाळेकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा. दिनकर वाडीकर यांनी केले. कार्यक्रमास विठ्ठलराव देशमुख जगापूरकर, रामराव उर्फ बंडू देशमुख तरोडेकर, आनंदीदास कल्याणकर, अशोकराव देशमुख, पंडितराव देशमुख पिंपळगावकर, शिवाजीराव देशमुख व प्रमोदराव पतंगे आदींचे सहकार्य लाभले.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना सिडको येथील जनसंपर्क कार्यालयात अभिवादन



नवीन नांदेड (प्रतिनिधी)- शिवसेनेचे दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या सिडको जनसंपर्क कार्यालयात हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी रवी थोरात, माजी शहरप्रमुख साहेबराव मामीलवाड, शिवसेनेचे उपशहरप्रमुख राजूसिंग टमान्ना, वैजनाथ माने, पप्पू गायकवाड, सिडको शहर युवा सेना शहर प्रमुख गौरव दरबस्तवार, रवि रायभोळे, कृष्णा पांचाळ, दशरथ खंदारे मुन्ना कोलंबीकर, मयुर सुत्रावे व ज्येष्ठ नागरिक यांची उपस्थिती होती.

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचा उपक्रम; यंदा १९ वे वर्ष, सायंकाळी ६ वाजता मंदिरांमध्ये दीपप्रज्वलनाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांचे आवाहन

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त २४ नोव्हेंबरला नांदेड शहरात लक्षदीपोत्सव

नांदेड (प्रतिनिधी)- प्रकाश, श्रद्धा आणि भक्तीचा त्रिवेणी संगम असलेला त्रिपुरारी (कार्तिकी) पौर्णिमेचा पवित्र उत्सव यंदा २४ नोव्हेंबर रोजी साजरा होत आहे. या मंगलपर्वाचे औचित्य साधून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने यंदाही राज्यभर लक्षदीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाचे हे १९ वे वर्ष असून, नांदेड जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दीपोत्सवाची परंपरा अधिक व्यापक करावी, असे आवाहन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा दीपोत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ठीक ६ वाजता प्रत्येकाने आपल्या जवळच्या मंदिरात मंदिर विश्वस्तांची पूर्वपरवानगी घेऊन दीपप्रज्वलन करावे. या माध्यमातून सामूहिक श्रद्धा, धार्मिक एकात्मता आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्याचा महासंघाचा प्रयत्न आहे. यावर्षी एक लाख दीप प्रज्वलित करण्याचा मानस असल्याचे निखिल लातूरकर यांनी यावेळी सांगितले.

हिंदू धर्मपरंपरेत कार्तिकी पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. पौराणिक मान्यतेनुसार, भगवान शिवाने त्रिपुरासुर या राक्षसाचा वध करून देवतांना त्याच्या अत्याचारातून मुक्त केले. या विजयाच्या स्मरणार्थ हा दिवस 'त्रिपुरारी पौर्णिमा' म्हणून ओळखला जातो. या दिवशी मंदिरांमध्ये दीपप्रज्वलन, दीपदान आणि विशेष पूजाअर्चा केली जाते. अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि अधर्मावर धर्माचा विजय हा या उत्सवाचा संदेश आहे.

केवळ मंदिरांनाच नव्हे, तर प्रत्येकाच्या मनालाही भक्तीच्या प्रकाशाने उजळविणारा हा दीपोत्सव ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नांदेडमधील सर्व समाजबांधवांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून लक्षदीपोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, राष्ट्रीय उपाध्यक्षा प्रीती वडवळकर, नांदेड जिल्हाध्यक्षा भाग्यश्री कुलकर्णी, जिल्हाप्रमुख अनंत राखे, महानगराध्यक्ष केदार नांदेडकर, बालासाहेब पांडे, सुनील रामदासी, राजेश कुलकर्णी, अपर्णा मोकाटे, सुवर्णा भोरे, यामिनी नांदेडकर यांनी केले आहे.

ग्यानमाता विद्या विहार शाळेचे खेळाडू राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेकरिता पात्र

नांदेड (प्रतिनिधी)- नुकत्याच आंतर शालेय विभागीय धनुर्विद्या (आर्चरी) स्पर्धा धाराशिव येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी करत ग्यानमाता विद्या विहार नांदेड शाळेचे धनुर्विद्या स्पर्धेमध्ये आपापल्या गटामध्ये चमकदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले आणि आंतर शालेय राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

शाळेचे धनुर्धर कु. अक्षरा सुधाकर राठोड, कृष्णा माधव दुयेवाड, आद्रित प्रसाद रायचूरकर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. या सर्व खेळाडूंची सोलापूर येथे होणाऱ्या आंतर शालेय धनुर्विद्या (आर्चरी) राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. विजेत्या खेळाडूंना शाळेचे क्रीडाशिक्षक विष्णू शिंदे, फेलिक्स पिल्ले, अलेक्स, सौ. श्वेता ठाकूर, सौ. यदुकृष्णा यांचे मार्गदशन लाभले.

राज्यस्तरीय धनुर्विद्या (आर्चरी) स्पर्धेसाठी शाळेचे प्राचार्य फा. ईग्राथी, शाळेचे अधीक्षक फा. आनंद, सिस्टर्स, शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

सर्पदंश रुग्णाची ॲम्बुलन्स रस्त्यातच बंद; ३५ मिनिटे जीवघेणी प्रतीक्षा

धर्माबाद ग्रामीण रुग्णालयाचा भोंगळ कारभार उघड

नांदेड (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील धर्माबाद ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेचा संतापजनक भोंगळ कारभार समोर आला आहे. सर्पदंश झालेल्या रुग्णाला पुढील उपचारासाठी नेत असताना शासकीय रुग्णवाहिकाच रस्त्यात बंद पडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेचा व्हीडीओ सध्या समाज माध्यमावर समोर आला आहे.

धर्माबाद तालुक्यातील बामणी गावातील अशोक तापलोड यांना सर्पदंश झाला होता. त्यांना धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी निजामाबाद येथे नेत असताना वाटेतच रुग्णवाहिका बंद पडली.

दुसरी रुग्णवाहिका मिळवण्यासाठी तब्बल ३५ मिनिटे रुग्णाला रस्त्यावरच जीवघेणी प्रतीक्षा करावी लागली. सर्पदंशासारख्या वेळेशी लढा देणाऱ्या प्रकरणात ही ३५ मिनिटे म्हणजे रुग्णाच्या जीवाशी खेळ असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

धक्कादायक म्हणजे त्याचवेळी प्रसूती झालेल्या एका महिलेलाही पुढील उपचारासाठी बिलोलीहून रुग्णवाहिका बोलवावी लागली. दोन्ही रुग्ण गंभीर असतानाही रुग्णालयात ऑक्सिजन आणि तज्ज्ञ डॉक्टरांची सुविधा उपलब्ध नव्हती, असे व्हीडीओतून समोर येत आहे.

मराठा सेवा संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनात इंजि. शिवाजीराजे पाटील यांचा सन्मान



ग्वाल्हेर/नांदेड (प्रतिनिधी) - विद्यार्थी, युवक-युवती आणि पालकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी गेली तीन दशके निःस्वार्थ भावनेने कार्यरत असलेले सुप्रसिद्ध स्टुडंट-पॅरेंट कौन्सिलर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे माईंड पॉवर ट्रेनर, लाईफ स्किल कोच आणि युवाप्रिय वक्ते इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक, सामाजिक व वैचारिक कार्याचा मराठा सेवा संघाच्या पाचव्या राष्ट्रीय अधिवेशनात विशेष गौरव करण्यात आला. देशभरातील युवकांच्या जडणघडणीसाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाची दखल घेत मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

न्या. भीमराव नरवाडे पाटील, इंजि. पुरुषोत्तम खेडेकर, इंजि. शे. रा. पाटील आणि प्रा. व्ही. डी. कोनाळे, इंजि. सुरेश शेळके यांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घेत इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी विद्यार्थी, युवक-युवती आणि पालकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव कर्नाटकचे मंत्री मारियोजी राव, राज्यसभा सदस्य खा. रामराव वडकुते, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार आणि सुनील महाजन यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

याप्रसंगी ॲड. शिवाजीराव थोरात, उद्योजक रतिराम पाटील, न्यायदान कक्षाचे ॲड. जयंत शितोळे, सोनल चव्हाण, नीरू वायबसे, शरद चव्हाण, प्रमोद महाजन, ॲड. कोमल देशमुख, वीरेंद्र शिंदे, मीनाक्षी महाजन, रोशनी पाटील जाधव, पूजा हुले, प्रा. कपिल पिचेवार, गणेश कापसे, सोपानमामा क्षीरसागर, डॉ. संजय पाटील, ॲड. आकाश काकडे, मनीषा पाटील, अनिल मांडोकर आणि दीपक फाळके यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

युवक आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा आपल्या कार्याचा केंद्रबिंदू मानून इंजि. शिवाजीराजे पाटील यांनी देश-विदेशात विविध विषयांवर प्रभावी मार्गदर्शन केले आहे. 'लेट अस नो बेटर अवर बेटरहाफ', 'आनंदी सहजीवन', 'पॉवर ऑफ सबकॉन्शस माईंड', 'पॉवर ऑफ पॉझिटिव्ह थिंकिंग', 'लीडरशिप डेव्हलपमेंट प्रोग्राम', 'फॅक्लटी डेव्हलपमेंट प्रोग्राम', 'स्टुडंट डेव्हलपमेंट प्रोग्राम' तसेच 'कम्युनिकेशन अँड रायटिंग स्किल्स' अशा विविध प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी आजवर पाच हजारांहून अधिक व्याख्याने दिली आहेत.

नांदेड कोषागार कार्यालयात १८ ते २३ नोव्हेंबर दरम्यान कार्यशाळा

निवृत्तीवेतनधारकांना सहभागी होण्याचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल पद्धतीने हयातीचा दाखला सादर करणे सुलभ व्हावे, यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने १८ ते २३ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या 'जीवन प्रमाण' या संकेतस्थळाद्वारे डिजिटल हयातीचा दाखला सादर करण्याच्या प्रक्रियेबाबत या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार १ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सर्व निवृत्तीवेतनधारकांनी डिजिटल पद्धतीने हयातीचे दाखले सादर करणे अपेक्षित आहे. यासाठी आवश्यक नोंदणी, पोर्टलचा वापर आणि डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्याच्या प्रक्रियेची माहिती कार्यशाळेत देण्यात येणार आहे. या कार्यशाळा जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड येथे दररोज सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येणार आहेत.

नांदेड जिल्ह्यातील राज्य शासनाचे निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी (स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवृत्तीवेतनधारक वगळून) या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती शोभा मुंडे यांनी केले आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे नावाचा झंझावात निर्माण करण्यासाठी कामाला लागा -जिल्हाप्रमुख बबनराव बारसे



अर्धापूर (प्रतिनिधी)- शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार शिवसैनिकांना ऊर्जा देणारे असून, गावागावांत झंझावात निर्माण करण्यासाठी शिवसैनिकांनी मरगळ झटकून जोमाने कामाला लागावे, असे आवाहन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे केले.

वसमत फाटा येथील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे चौकाचे पूजन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना नांदेड जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, तालुकाप्रमुख संतोष कल्याणकर, नांदेड तालुकाप्रमुख सुनील कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे म्हणाले की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे रोखठोक व प्रेरणा देणारे विचार घराघरांत पोहचवा, तसेच आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी मरगळ झटकुन जोमाने कामाला लागा, असे आवाहनही बबनराव बारसे यानी केले.

यावेळी शेतकरी सेना तालुका प्रमुख रमेश क्षीरसागर, शिवसेनेचे ॲड. रवी पाटील शिंदे, दत्ता पाटील भरकड, नागोराव ढगे, संतोष कदम, नागेश सरोळे, अशोक डांगे, उपजिल्हाप्रमुख चेतन देशमुख, राजेश डाकोरे, युवा सेना शहरप्रमुख होनाजी जोगदंड, सोशल मीडिया तालुकाप्रमुख शेख रफिक, शंकर हाफगुडे, ओमप्रकाश नागलमे, उपशहर प्रमुख शिवप्रसाद दाळपुसे, प्रसाद खुर्दामोजे, बंटी पाटील, केशव डाकोरे, लखन पताळे, सदाशिव कदम, किरण कदम, विष्णू कपाटे, संकेत कदम, केशव पताळे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

नांदेड विभागातील ४ रेल्वेगाड्यांच्या डब्यांतील संरचनेत बदल

नांदेड (प्रतिनिधी)- दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागांतर्गत धावणाऱ्या ४ रेल्वेगाड्यांच्या डब्यांतील संरचनेत बदल करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयानुसार संबंधित रेल्वेगाड्यांना सध्या जोडण्यात येणाऱ्या पारंपरिक IRS प्रकारच्या डब्यांऐवजी CBC प्रकारचे डबे जोडण्यात येणार आहेत.

या बदलामुळे रेल्वेगाड्यांच्या डब्यांच्या संरचनेत सुधारणा होणार असून, प्रवाशांच्या प्रवास सुविधांच्या दृष्टीने रेल्वे डब्यांचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे.

सध्या या रेल्वेगाड्यांना एकूण १६ डबे जोडण्यात येतात. त्यामध्ये १४ जनरल सेकंड क्लास (GS) आणि २ सेकंड क्लास लगेज-कम-ब्रेक व्हॅन (SLR) डब्यांचा समावेश आहे.

सुधारित संरचनेनुसार आता या रेल्वेगाड्यांना एकूण १६ डबेच जोडण्यात येतील. त्यामध्ये १४ (WGSCZ) सेकंड क्लास चेयर कार प्रकारचे डबे आणि २ SLR डबे असतील.

गाडी क्रमांक ५७६५१ /५७६५२ हजूर साहिब नांदेड मनमाड हजूर साहिब नांदेड - नांदेड येथून १९ नोव्हेंबर २०२६ आणि मनमाड येथून २० नोव्हेंबर २०२६ पासून हा बदल लागू होईल.

गाडी क्रमांक ५७६५३/५७६५४ पूर्णा - आदिलाबाद -परळी वैजनाथ- पूर्णा येथून २० नोव्हेंबर २०२६ आणि आदिलाबाद येथून २१ नोव्हेंबर २०२६ पासून हा बदल लागू होईल

गाडी क्रमांक ५७६५५/५७६५६ परळी वैजनाथ- अकोला- पूर्णा - परळी वैजनाथ येथून २१ नोव्हेंबर २०२६ आणि अकोला येथून २२ नोव्हेंबर २०२६ पासून हा बदल लागू होईल.

दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाच्या रेल्वे सुविधांचा लाभ घ्या -प्रवीण गायकवाड

मुदखेड (प्रतिनिधी)- कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त आदिलाबाद - नांदेड- पंढरपूर दरम्यान ४ विशेष रेल्वे फेऱ्या भाविकांच्या अतिरिक्त गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेने निर्णय घेतला आहे. नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड व परळी वैजनाथ मार्गे विशेष रेल्वे धावणार आहेत.

कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूर येथे जाणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत आदिलाबाद ते पंढरपूर दरम्यान विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या विशेष रेल्वेगाड्यांमुळे महाराष्ट्राच्या मराठवाडा तसेच विदर्भातील भाविकांना पंढरपूर येथे जाण्यासाठी अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे. ही विशेष रेल्वे आदिलाबाद, किनवट, बोधडी बुजुर्ग, सहस्रकुंड, हिमायतनगर, हदगाव रोड, भोकर, मुदखेड, हजूर साहिब नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन आणि कुर्डुवाडी मार्गे पंढरपूरपर्यंत धावणार आहे.

रेल्वे क्रमांक ०७६२५ आदिलाबाद ते पंढरपूर विशेष : ही विशेष रेल्वे दिनांक १९ नोव्हेंबर २०२६ (गुरुवार) आणि २३ नोव्हेंबर २०२६ (सोमवार) रोजी आदिलाबाद येथून सकाळी ०७:१५ वाजता प्रस्थान करेल.

किनवट, बोधडी बुजुर्ग, सहस्रकुंड, हिमायतनगर, हदगाव रोड, भोकर, मुदखेड, हजूर साहिब नांदेड, पूर्णा जंक्शन, परभणी जंक्शन, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी जंक्शन, मोडनिंब, पंढरपूर येथे मध्यरात्री ००:३० वाजता आगमन होईल.

रेल्वे क्रमांक ०७६२६ पंढरपूर ते आदिलाबाद विशेष : ही गाडी दिनांक २० नोव्हेंबर २०२६ (शुक्रवार) आणि २४ नोव्हेंबर २०२६ (मंगळवार) रोजी पंढरपूर येथून रात्री २०:०० वाजता प्रस्थान करेल आणि आलेल्या मार्गानेच आदिलाबाद येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १२:०० वाजता आगमन करेल.

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन या विशेष रेल्वेला एकूण २४ डबे जोडण्यात येणार आहेत. कार्तिकी एकादशी यात्रेसाठी पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांनी या विशेष रेल्वेसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारत सरकारच्या दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे नव नियुक्त सल्लागार समितीचे सदस्य प्रवीण गायकवाड यांनी केले आहे.

फॅशन | संसार | सौंदर्य

सखी



पहिल्याच नजरेत प्रेम होते, ही केवळ कल्पना नाही!

नव्या सर्वेक्षणातून प्रेमाविषयी रंजक खुलासे; 60 टक्के अविवाहितांचा प्रेमावर विश्वास

एखाद्या व्यक्तीला पहिल्यांदा पाहताच तिच्याविषयी मनात विशेष आकर्षण निर्माण होऊ शकते का? पहिल्याच भेटीत प्रेमात पडणे शक्य आहे का? चित्रपटांमध्ये अशा अनेक प्रेमकथा आपण पाहिल्या आहेत. दोन अनोळखी व्यक्तींची नजरानजर होते आणि क्षणात त्या एकमेकांच्या प्रेमात पडतात, असे प्रसंग चित्रपटांमध्ये नेहमीच दाखवले जातात. मात्र, प्रत्यक्ष आयुष्यातही अनेकांचा या भावनेवर विश्वास असल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आले आहे.

'सिंगल्स इन इंडिया' या सर्वेक्षणानुसार, तब्बल ६० टक्के अविवाहित व्यक्तींनी पहिल्याच नजरेत प्रेम होऊ शकते, असे मान्य केले आहे. त्यामुळे पहिल्या नजरेतील प्रेम ही केवळ चित्रपटांची कल्पना नसून आजही अनेकांच्या मनात या भावनेला विशेष स्थान असल्याचे स्पष्ट होते. कधी एखाद्या पार्टीत, लग्नसमारंभात किंवा प्रवासादरम्यान आपली नजर एखाद्या अनोळखी व्यक्तीवर पडते. तिचे हास्य, बोलण्याची पद्धत, आत्मविश्वास किंवा वागण्यातील सहजता आपल्याला भावू लागते. त्यानंतर वारंवार त्याच व्यक्तीचा विचार मनात येतो. पुन्हा एकदा भेटण्याची इच्छा निर्माण होते. या भावनेला पहिल्या नजरेतील प्रेम म्हणता येईल का? याविषयी सर्वेक्षणातून काही रंजक माहिती समोर आली आहे.

पहिल्याच नजरेत प्रेम होऊ शकते का, याचा शोध घेण्यासाठी 'सिंगल्स इन इंडिया सर्व्हे २०२६' करण्यात आला होता. यामध्ये सुमारे पाच हजार अविवाहित व्यक्तींचा सहभाग होता. या सर्वेक्षणातील निष्कर्षांनुसार, ६० टक्के अविवाहित व्यक्तींनी पहिल्याच नजरेत प्रेम होऊ शकते, असे मत व्यक्त केले. विशेष म्हणजे, जवळपास निम्म्या सहभागी व्यक्तींनी आपल्या आयुष्यात पहिल्या नजरेतील प्रेमाचा अनुभव घेतल्याचेही सांगितले. या आकडेवारीवरून आजच्या आधुनिक काळातही पहिल्या भेटीत निर्माण होणाऱ्या प्रेमाच्या भावनेवर अनेकांचा विश्वास असल्याचे दिसून येते.

पहिल्याच भेटीत एखादी व्यक्ती का आवडते?

एखाद्या व्यक्तीला पहिल्यांदा भेटल्यानंतर तिच्याविषयी मनात विशेष ओढ निर्माण होण्यामागे केवळ तिचे सौंदर्य कारणीभूत नसते. तिचे बोलणे, हसण्याची पद्धत, आत्मविश्वास, देहबोली आणि इतरांशी वागण्याची रीतही आपल्याला आकर्षित करू शकते. काही व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी असते की, त्यांची उपस्थितीही आपल्याला आनंददायी वाटू लागते. त्यांच्याविषयी अधिक जाणून घेण्याची इच्छा निर्माण होते. कधीकधी एखादी छोटीशी भेटसुद्धा मनावर कायमची छाप सोडते. अशा सुरुवातीच्या आकर्षणातून पुढे प्रेमाची भावना निर्माण होऊ शकते. मात्र, हे आकर्षण प्रेमात बदलेलच असे नाही.

प्रेम आणि आकर्षण यात काय फरक आहे?

पहिल्याच नजरेत एखादी व्यक्ती आवडणे आणि तिच्यावर खरे प्रेम करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. एखाद्या अनोळखी व्यक्तीला पहिल्यांदा पाहताना तिच्या आवडीनिवडी, सवयी, विचार आणि स्वभाव यांची आपल्याला फारशी माहिती नसते. अशा वेळी तिचे रूप, बोलण्याची पद्धत किंवा व्यक्तिमत्त्व आपल्याला आकर्षित करू शकते. मात्र, प्रेम केवळ बाह्य सौंदर्यावर अवलंबून नसते. एखाद्या व्यक्तीचा स्वभाव, विचार, गुण-दोष आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन समजून घेतल्यानंतरच तिच्याशी असलेल्या नात्याची खरी खोली लक्षात येते. त्यामुळे पहिल्या नजरेतील आकर्षण ही प्रेमाची सुरुवात ठरू शकते; परंतु प्रत्येक आकर्षणाचे रूपांतर प्रेमात होतेच असे नाही.

असे प्रेम आयुष्यभर टिकू शकते का?

काही प्रेमकथा पहिल्याच भेटीत सुरू होतात आणि पुढे आयुष्यातील सर्वांत सुंदर नात्याचे रूप धारण करतात. मात्र, पहिल्या नजरेत एखादी व्यक्ती आवडणे म्हणजे आयुष्यभराचे नाते निश्चित झाले, असे नाही. कोणतेही नाते दीर्घकाळ टिकण्यासाठी परस्परांवरील विश्वास, आदर, समजूतदारपणा आणि संवाद आवश्यक असतो. दोघांनीही एकमेकांचे गुण स्वीकारण्याबरोबरच कमतरताही समजून घेणे महत्त्वाचे असते. नात्यातील अडचणींना सामोरे जाताना एकमेकांना साथ देणे आणि एकमेकांच्या भावनांचा आदर करणे यामुळे नाते अधिक घट्ट होते. त्यामुळे पहिल्या नजरेतील प्रेम नात्याची सुरुवात करू शकते; मात्र ते आयुष्यभर टिकवण्यासाठी दोघांचेही प्रयत्न आवश्यक असतात.

कोणीतरी आवडले तर काय करावे?

एखादी व्यक्ती पहिल्याच भेटीत मनाला भावली असेल, तर त्या भावनेला समजून घेण्यासाठी थोडा वेळ द्या. लगेचच त्या व्यक्तीला आपल्या आयुष्यातील सर्वांत खास व्यक्ती मानण्याऐवजी तिच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करा. तिचे विचार, आवडीनिवडी, स्वभाव आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जाणून घ्या. तसेच ती व्यक्तीही तुमच्यामध्ये तितकाच रस दाखवत आहे का, हे समजून घेणे आवश्यक आहे. दोघांमध्ये विचारांची देवाणघेवाण होऊ लागली, एकमेकांबद्दल विश्वास निर्माण झाला आणि भावनिक जवळीक वाढू लागली, तर सुरुवातीचे आकर्षण एका सुंदर नात्यात बदलू शकते.

लग्नाच्या मेकअपपूर्वी ब्युटीशियनला सांगा या गोष्टी!



थ्रेडिंग अन् वॅक्सिंगसाठी किमान 24 ते 48 तासांचे अंतर ठेवा...

लग्नसमारंभ असो किंवा अन्य एखादा खास सोहळा, प्रत्येक महिलेला या दिवशी आपले सौंदर्य अधिक खुलून दिसावे, असे वाटते. त्यासाठी आकर्षक मेकअप करण्याबरोबरच त्वचेची योग्य काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे असते. मात्र, उत्तम मेकअपसाठी केवळ कुशल मेकअप आर्टिस्ट पुरेसा नसतो, तर त्वचेची आधीपासून केलेली योग्य तयारीही आवश्यक असते. त्वचेचा प्रकार, संवेदनशीलता, ॲलर्जी आणि सुरू असलेले उपचार यांची माहिती मेकअप आर्टिस्टला देणे गरजेचे आहे. मेकअप अधिक आकर्षक आणि दीर्घकाळ टिकणारा होण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, जाणून घेऊया...

तयारी अनेक दिवस आधीपासूनच करा...

» मेकअप करण्यापूर्वी मेकअप आर्टिस्टकडून थोडी त्वचेची निगा राखली म्हणजे चेहऱ्याला अपेक्षित उठाव मिळेलच, असे नाही. त्यासाठी काही दिवस आधीपासूनच त्वचेची योग्य काळजी घेणे आवश्यक असते. अनेकदा लग्न किंवा एखाद्या समारंभासाठी मेकअप करून घेतल्यानंतर अपेक्षित लूक मिळत नाही. त्यामुळे निराशा होऊ शकते. मात्र, प्रत्येक वेळी यासाठी मेकअप आर्टिस्टचे कौशल्य कारणीभूत असतेच असे नाही. काही वेळा त्वचेची योग्य तयारी न झाल्यामुळेही मेकअप अपेक्षेप्रमाणे दिसत नाही. त्यामुळे मेकअप करण्यापूर्वी त्वचेविषयीची आवश्यक माहिती देण्यासह काही खबरदारी घेणेही महत्त्वाचे आहे.



» त्वचेची संवेदनशीलता अन् ॲलर्जीची माहिती द्या : तुमची त्वचा संवेदनशील असेल किंवा एखाद्या विशिष्ट सौंदर्यप्रसाधनाची ॲलर्जी असेल, तर त्याची माहिती मेकअप आर्टिस्टला आधीच द्या. एखादे उत्पादन वापरल्यानंतर त्वचेवर पुरळ येणे, लालसरपणा, खाज किंवा जळजळ होणे अशा समस्या जाणवत असतील, तर त्या स्पष्टपणे सांगा. डोळ्यांभोवती संवेदनशीलता असेल, डोळ्यांच्या सौंदर्यप्रसाधनांमुळे जळजळ होत असेल किंवा फाउंडेशन लावल्यानंतर चेहऱ्यावर विशिष्ट ठिकाणी पुरळ अथवा डाग निर्माण होत असतील, तर त्याचीही माहिती द्या. यामुळे मेकअप आर्टिस्टला योग्य उत्पादने निवडणे आणि आवश्यक तंत्र वापरणे सोपे जाते.

» त्वचारोग उपचारांची माहिती द्या : चेहऱ्यावर मुरुम, काळे डाग, सुरकुत्या, वांग किंवा रंगद्रव्यांच्या असमानतेची समस्या असल्यास आणि त्यावर डॉक्टरांकडून उपचार सुरू असल्यास, त्याची माहिती मेकअप आर्टिस्टला देणे आवश्यक आहे. विशेषतः रेटिनॉल, त्वचेवरील मृत पेशी काढून टाकणारी आम्ले किंवा डॉक्टरांनी सुचवलेल्या औषधी क्रीमचा वापर सुरू असल्यास ते आवर्जून सांगा. अशा उपचारांमुळे त्वचा कोरडी, संवेदनशील किंवा सोलवटलेली होऊ शकते. त्यामुळे मेकअप करताना त्वचेचा प्रकार आणि तिची सद्यःस्थिती लक्षात घेऊनच सौंदर्यप्रसाधने निवडणे आवश्यक असते. एखाद्या गंभीर त्वचेच्या समस्येवर उपचार सुरू असल्यास मेकअप करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या. तसेच चेहऱ्यावर वॅक्सिंग करणे किंवा अन्य सौंदर्योपचार घेणे सुरक्षित आहे की नाही, याची खात्री करून घ्या.

» त्वचेचा प्रकार आधीच स्पष्ट करा : तुमची त्वचा तेलकट, कोरडी, खरखरीत की मिश्र स्वरूपाची आहे, हे मेकअप आर्टिस्टला आधीच सांगा. यामुळे त्वचेला अनुरूप प्रायमर, फाउंडेशन आणि इतर सौंदर्यप्रसाधने निवडणे सोपे जाते. त्वचेच्या प्रकारानुसार मेकअपची पद्धतही बदलते. योग्य उत्पादने आणि त्वचेची योग्य पूर्वतयारी केल्यास मेकअपमध्ये थर जमा होणे, चेहऱ्यावर ठिकठिकाणी मेकअपचे डाग दिसणे किंवा मेकअप असमान होणे अशा समस्या टाळता येतात. याशिवाय मेकअपपूर्वी कोणती त्वचानिगा घ्यावी, याबाबतही मेकअप आर्टिस्ट योग्य मार्गदर्शन करू शकतात.

» चेहऱ्यावर जाड थर तयार करणारी उत्पादने लावू नका : मेकअप करण्यापूर्वी स्वतःच्या मनाने कोणतेही त्वचानिगेचे उत्पादन चेहऱ्यावर लावणे टाळा. विशेषतः अतिशय घट्ट किंवा तेलकट स्वरूपाची उत्पादने वापरणे टाळावे. अशा उत्पादनांमुळे त्वचेवर जाड थर तयार होतो. त्यामुळे फाउंडेशन त्वचेवर व्यवस्थित बसत नाही. परिणामी मेकअप केकी म्हणजेच पापुद्र्यासारखा दिसू शकतो. चेहऱ्याला स्पर्श केल्यास मेकअप जागेवरून निघण्याचीही शक्यता असते. त्यामुळे मेकअपपूर्वी त्वचेच्या प्रकारानुसार योग्य उत्पादने मर्यादित प्रमाणात वापरणे महत्त्वाचे आहे.



» मेकअपच्या काही दिवस आधी नवीन उत्पादने वापरू नका : त्वचानिगेच्या दिनक्रमात काही बदल करायचे असतील, तर ते लग्न किंवा समारंभाच्या अगदी जवळ न करता काही महिने आधी करणे अधिक योग्य ठरते. मेकअपच्या काही दिवस किंवा आठवडे आधी नवीन उत्पादन वापरल्यास त्वचेवर पुरळ, लालसरपणा किंवा खाज येण्याची शक्यता असते. काही उत्पादनांमुळे त्वचा सोलवटू शकते. त्यामुळे मेकअपच्या दिवशी चेहऱ्याचा पोत असमान दिसू शकतो. एखादे उत्पादन वापरल्यानंतर त्वचेवर बदल जाणवल्यास ते उत्पादन आपल्याला मानवत नाही, असा निष्कर्ष स्वतःच काढू नका. काही उपचारांमध्ये त्वचेवर विशिष्ट प्रतिक्रिया दिसू शकतात. याबाबत त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. मेकअपच्या दिवशी त्वचेवर कोणतीही अनपेक्षित समस्या निर्माण होऊ नये, यासाठी आतापर्यंत नियमित वापरात असलेली आणि त्वचेला मानवणारी उत्पादनेच वापरणे योग्य ठरते.

» मेकअपच्या २४ ते ४८ तास आधी वॅक्सिंग किंवा थ्रेडिंग करू नका : मेकअपच्या अगदी आधी चेहऱ्यावर वॅक्सिंग, थ्रेडिंग, पीलिंग किंवा अन्य नवीन सौंदर्योपचार करून घेणे टाळा. वॅक्सिंग आणि थ्रेडिंगमुळे त्वचेवर लालसरपणा, पुरळ, कोरडेपणा किंवा जळजळ निर्माण होऊ शकते. वॅक्सिंगमुळे त्वचेच्या वरच्या थरावरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे त्वचा सोलवटणे किंवा तिचा पोत बदलणे अशा समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे वॅक्सिंग, थ्रेडिंग आणि मेकअप यांच्यामध्ये त्वचेला पूर्ववत होण्यासाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. या दोन्ही प्रक्रियांमध्ये किमान २४ ते ४८ तासांचे अंतर ठेवावे. जर तुम्ही रासायनिक पीलिंग, लेझर किंवा अन्य त्वचारोगविषयक उपचार घेतले असतील, तर त्वचा पूर्णपणे पूर्ववत होण्यासाठी किती वेळ लागेल, याबाबत डॉक्टरांचा सल्ला घ्या. त्यानुसार मेकअपचे नियोजन करा.

त्वचेची स्वच्छता, टोनिंग अन् मॉइश्चरायझिंग करा...

» मेकअपपूर्वी त्वचेची स्वच्छता, टोनिंग आणि मॉइश्चरायझिंग अर्थात सीटीएम ही प्रक्रिया महत्त्वाची आहे.

» क्लिन्झिंग : सौम्य क्लिन्झरने चेहरा स्वच्छ धुवा. त्वचेवरील धूळ, मळ आणि अतिरिक्त तेल काढून टाकण्यास यामुळे मदत होते.

» टोनिंग : त्वचेच्या प्रकारानुसार योग्य आणि अल्कोहोलविरहित टोनर वापरा.

» मॉइश्चरायझिंग : त्वचेच्या गरजेनुसार हलके मॉइश्चरायझर लावा. यामुळे त्वचेला आवश्यक ओलावा मिळतो.

लग्नासाठी ना भटजींची गरज, ना पारंपरिक विधींचा बडेजाव! 'सेल्फ रिस्पेक्ट वेडिंग' म्हणजे नेमके काय?

आधुनिक काळात विवाह करण्याच्या पद्धतीतही मोठे बदल होत आहेत. पूर्वी पारंपरिक विवाहसोहळ्यांऐवजी न्यायालयात जाऊन विवाह नोंदणी करण्याला अनेकजण प्राधान्य देत होते. मात्र, आता विवाहाची आणखी एक वेगळी पद्धत चर्चेत आली आहे. ती म्हणजे 'सेल्फ रिस्पेक्ट वेडिंग' अर्थात स्वाभिमानी विवाह! या विवाहपद्धतीत पारंपरिक धार्मिक विधी, मंत्रोच्चार किंवा पुरोहितांची आवश्यकता नसते. त्याऐवजी परस्पर संमती, समानता आणि एकमेकांप्रती आदर यांना सर्वाधिक महत्त्व दिले जाते. विशेष म्हणजे, ही विवाहपद्धती आधुनिक काळातील संकल्पना नसून तिचा इतिहास जवळपास शंभर वर्षे जुना आहे. अलीकडेच प्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध रविचंदर आणि व्यावसायिक काव्या मारन यांच्या विवाहामुळे ही पद्धत पुन्हा चर्चेत आली आहे.



संगीतकार अनिरुद्ध रविचंदर यांच्या विवाहामुळे चर्चा

सेल्फ रिस्पेक्ट वेडिंग ही संकल्पना अलीकडे अधिक चर्चेत आली. तमिळनाडूचे मंत्री डॉ. टी. आर. बी. राजा यांनी समाजमाध्यमांवर दिलेल्या माहितीनुसार, संगीतकार अनिरुद्ध रविचंदर आणि व्यावसायिक काव्या मारन यांनी या पद्धतीने विवाह केला. या विवाहसोहळ्यात दोघांनी एकमेकांना हार आणि साखळी घालून वैवाहिक नात्याची सुरुवात केली. पारंपरिक धार्मिक विधींपेक्षा परस्पर संमती आणि समानतेला महत्त्व देणाऱ्या या विवाहपद्धतीने अनेकांचे लक्ष वेधून घेतले.

काय आहे 'सेल्फ रिस्पेक्ट वेडिंग'?

'सेल्फ रिस्पेक्ट वेडिंग' ही संकल्पना १९२५ मध्ये तमिळनाडूमध्ये सुरू झालेल्या स्वाभिमान चळवळीतून पुढे आली. ई. व्ही. रामासामी नायकर ऊर्फ पेरियार यांनी या चळवळीच्या माध्यमातून जातिभेद, सामाजिक विषमता आणि पुरुषप्रधान व्यवस्थेला आव्हान दिले होते. तमिळ भाषेत या विवाहपद्धतीला 'सुयमरियादई तिरुमनम' असे म्हटले जाते. समाजातील अनावश्यक रूढी-परंपरा आणि धार्मिक बंधनांपासून विवाहसंस्थेला मुक्त करून स्त्री-पुरुष समानतेवर आधारित वैवाहिक नाते निर्माण करणे, हा या संकल्पनेमागील प्रमुख उद्देश होता. या विवाहपद्धतीत विवाहासाठी धार्मिक विधी किंवा पुरोहितांची सक्ती नसते. दोन्ही व्यक्तींची स्वेच्छा, समान अधिकार आणि परस्परांचा सन्मान यांना महत्त्व दिले जाते.

कसा पार पडतो हा विवाहसोहळा?

पारंपरिक विवाहपद्धतीपेक्षा स्वाभिमानी विवाह पूर्णपणे वेगळा असतो. यामध्ये सप्तपदी, मंत्रोच्चार, होम-हवन किंवा पुरोहितांच्या उपस्थितीची आवश्यकता नसते. या विवाहात वधू आणि वर यांच्या कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि साक्षीदार उपस्थित राहू शकतात. दोघेही एकमेकांना हार, साखळी किंवा अंगठी घालून विवाहबंधनात अडकण्याचा निर्णय जाहीर करू शकतात. परस्पर संमतीने विवाह करण्याची प्रतिज्ञा करूनही हा सोहळा पार पडतो. या विवाहपद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे कोणत्याही एका व्यक्तीचे वर्चस्व नसते. स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान स्थान दिले जाते. विवाह हा केवळ धार्मिक विधी नसून दोन व्यक्तींनी स्वेच्छेने स्वीकारलेली आयुष्यभराची जबाबदारी आहे, हा विचार त्यामागे आहे. या पद्धतीत पारंपरिक धार्मिक विवाहविधींचा अभाव असला, तरी कायदेशीर विवाहाच्या आवश्यक अटींचे पालन करणे महत्त्वाचे असते. त्यामुळे ही पद्धत आणि न्यायालयीन विवाह या दोन्हींचे स्वरूप वेगवेगळे आहे.

कोणत्या राज्यांमध्ये या विवाहाला कायदेशीर मान्यता?

हिंदू विवाह अधिनियम, १९५५ मध्ये कलम ७-अ समाविष्ट करून तमिळनाडूमध्ये अशा विवाहांना कायदेशीर मान्यता देण्यात आली. केंद्रशासित प्रदेश पुदुचेरीमध्येही या विवाहपद्धतीला कायदेशीर मान्यता आहे. या कायदेशीर तरतुदीनुसार, संबंधित अटींची पूर्तता करून वधू-वर एकमेकांसमोर विवाह करण्याची घोषणा करू शकतात. तसेच नातेवाईक, मित्र किंवा साक्षीदारांच्या उपस्थितीत एकमेकांना हार, अंगठी किंवा अन्य प्रतीकात्मक वस्तू देऊन विवाह पूर्ण करू शकतात. थोडक्यात सांगायचे तर, 'सेल्फ रिस्पेक्ट वेडिंग' ही केवळ विवाहाची वेगळी पद्धत नसून समानता, स्वातंत्र्य आणि परस्पर सन्मानाचा विचार मांडणारी शंभर वर्षांपूर्वीची सामाजिक चळवळ आहे. विवाहात दिखाऊपणा आणि अनावश्यक रूढींपेक्षा दोन व्यक्तींची संमती आणि एकमेकांप्रती असलेला आदर महत्त्वाचा आहे, हा संदेश या विवाहपद्धतीतून दिला जातो.



सोनिया गांधींचं पुस्तक फाडताना बाळासाहेबांचाच फोटो फाडला; आता शायना एनसी यांची सारवासारव



मुंबई (प्रतिनिधी)– काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रामध्ये सावरकरांचा अपमान झाल्याचा आरोप करत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्या आणि प्रवक्त्या शायना एनसी यांच्याकडून मोठी चूक झाली आहे. सोनिया गांधी यांच्या पुस्तकाच्या निषेधादरम्यान शायना एन. सी. यांच्याकडून बाळासाहेबांचा फोटो अनावधानाने फाडला गेल्याच समोर आलं आहे. सोनिया गांधींच्या पुस्तकांमधील फोटो फाडताना हा प्रकार घडला आहे. दरम्यान, या प्रकरणाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला असून या घटनेचा तीव्र पडसाद आता राजकीय वर्तुळात उमटू लागला आहे.

एकंदरीत या सर्व प्रकारावर शायना एन. सी. यांनी स्पष्टीकरण देत सर्व आरोप फेटाळले आहे. 'आम्ही म णिशंकर अय्यर यांचा फोटो फाडलाय. एकदा नाही तर १० वेळा आम्ही मणिशंकर अय्यर यांचा फोटो फाडू, अशी प्रतिक्रिया शायना एन. सी. यांनी दिली आहे.

दरम्यान, विरोधकांकडून खोटा नॅरेटिव्ह पसरवला जात आहे. तुम्ही आमची पत्रकार परिषद नीट ऐका. 'आम्ही एकदा नव्हे तर १० वेळा मणिशंकर अय्यरचा फोटो फाडू' आम्ही मणिशंकर अय्यर यांचा फोटो फाडला आहे. असेही शायना एन. सी. म्हणाल्या. दरम्यान, या प्रकरणाचे पडसाद आता राज्याचा राजकारण उम टत आहे. शायना एनसी यांच्याकडून बाळासाहेब ठाकरे यांच्या फोटोचा अवमान झाल्या प्रकरणी मुंबईत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नगरसेवक हे आक्रमक झाले आहेत. मुंबई म हानगरपालिकेमध्ये ते आंदोलन करत आहेत.

हिंदु हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आमचे दैवत आहे. त्यांची विचारधारा घेऊन आम्ही पुढे चाललो आहोत. सोनिया गांधींच्या पुस्तकात वीर सावरकरांचा अपमान करण्यात आलाय, त्याला आमचा विरोध आहे. आम्ही मणिशंकर अय्यर यांचा फोटो फाडलाय आणि एकदा नाही तर १० वेळा आम्ही तो फाडू. आमची पत्रकार परिषद नीट ऐका आणि बघा, विरोधकांकडून खोटा नॅरेटिव्ह पसरवला जात आहे.

जागतिक युवा टेबल टेनिस स्पर्धेसाठी नाशिकच्या कुशल चोपडाची भारतीय संघात निवड



नाशिक (प्रतिनिधी)– नाशिकच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद बातमी आहे. टेबल टेनिसपटू कुशल चोपडा याची प्रतिष्ठेच्या जागतिक युवा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. २१ ते २८ नोव्हेंबर २०२६ दरम्यान इस्तंबूल (तुर्की) येथे ही स्पर्धा रंगणार आहे. या निवडीमुळे आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस क्षेत्रात नाशिकच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या स्पर्धेसाठी निवड झालेला कुशल हा नाशिकम धून भारतीय संघात स्थान मिळवणारा पहिला मुलगा ठरला आहे. यापूर्वी तनिषा कोटेचा आणि सायली वाणी यांनी जागतिक युवा अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यामुळे या प्रतिष्ठित स्पर्धे त भारताचे प्रतिनिधित्व करणारा कुशल हा नाशिक शहरातील तिसरा खेळाडू ठरला आहे. कुशलसोबत आसामचा प्रियानुज भट्टाचार्य, तमिळनाडूचे पी. बी. अभिनंदन आणि मुथु बालमुरुगन यांचीही भारतीय संघात निवड झाली आहे. कुशलची भारतीय संघातील निवड ही त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे आणि उत्कृष्ट कामगिरीचे फलित आहे. यापूर्वी त्याने ज्युनियर आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकावले आहे.

दुर्धर आजारांवरील उपचारांचा महात्मा फुले जनआरोग्य योजनेत समावेश करा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश



मुंबई (प्रतिनिधी)– राज्यातील दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेळेत निदान आणि उपचार मिळावेत, तसेच महागड्या उपचारांचा आर्थिक भार त्यांच्या कुटुंबीयांवर पडू नये, यासाठी अशा आजारांचा महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेत समावेश करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोग्य विभागाला दिले आहेत. स्पायनल मस्क्युलर ॲट्रॉफी या दुर्धर आजाराच्या रुग्णांसाठी स्वतंत्र आणि सर्वंकष कार्यपद्धती तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

विधानभवनातील उपमुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात राज्यातील दुर्धर आजारांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य आयुक्त संजय काटकर, वाडिया रुग्णालयाचे बालरोगतज्ज्ञ डॉ. अनीष ऐनापुरे, केईएम रुग्णालयाच्या बालरोग विभागाच्या सह-अध्यापिका डॉ. प्रज्ञा जोशी आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत महाराष्ट्रातील डच रुग्णांची संख्या, आजाराचे निदान, उपलब्ध उपचारपद्धती, औषधांची उपलब्धता आणि रुग्णांना येणाऱ्या अडचणी यावर चर्चा झाली. या आजाराचे लवकर निदान व्हावे, रुग्णांची नोंदणी व्यवस्थित व्हावी आणि उपचारांची प्रक्रिया अधिक प्रभावी व्हावी, यासाठी आरोग्य विभागाने स्वतंत्र डजझ तयार करावी, असे शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्रासाठी केंद्र सरकारने मुंबईतील केईएम रुग्णालयाची 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून निवड केली आहे. या केंद्रामार्फत दुर्धर आजारांचे निदान, रुग्ण नोंदणी आणि उपचारविषयक कार्यवाही केली जाते.

मुंबईतील वाडिया बालरुग्णालयातही डच रुग्णांवरील उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे या रुग्णालयाला 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चा दर्जा मिळावा, यासाठी आरोग्य विभागाने आवश्यक प्रस्ताव तयार करून केंद्र सरकारकडे पाठवावा, असे निर्देश शिंदे यांनी दिले. यासाठी आपण केंद्रीय आरोग्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

एसएमए सारख्या दुर्धर आजारांवरील उपचार खर्चिक असल्याने अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे या आजाराचा महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेत समावेश करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश शिंदे यांनी दिले.

तसेच केईएम रुग्णालयाने या आजारावरील आवश्यक औषधांचा जीवनावश्यक औषधांच्या यादीत समावेश करून त्यांची खरेदी करावी, जेणेकरून 'सेंटर ऑफ एक्सलन्स'म ध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना औषधे वेळेत उपलब्ध होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुर्धर आजारांचे लवकर निदान, उपचारांची उपलब्धता, औषधांचा पुरवठा आणि रुग्णांना आर्थिक संरक्षण या सर्व बाबींवर समन्वयाने काम करून ठोस कार्यवाही करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोग्य विभागाला दिले.

मोदी-शाह यांच्या दौऱ्यांचे नियोजन; उत्तर प्रदेश निवडणुकीसाठी भाजपची रणनीती तयार

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणाऱ्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांसाठी राजकीय पक्ष तयारी करत असून रणनीती आखत आहेत. दरम्यान, भाजप डिसेंबरपासून आपला निवडणूक प्रचार तीव्र करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन हेदेखील निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. पुढील महिन्यापासून उत्तर प्रदेशचा व्यापक दौरा करणाऱ्या प्रम ुख नेत्यांचे कार्यक्रम निश्चित केले जात आहेत. कार्यकर्त्यांशी संपर्क साधण्यासाठी बूथ अधिवेशने आणि शक्ती केंद्र अधिवेशने आयोजित केली जातील. गृहमंत्री अमित शाह या अधिवेशनांना संबोधित करतील. याव्यतिरिक्त उत्तर प्रदेशातील सर्व सहा विभागांमध्ये जन आशीर्वाद यात्रा आयोजित केल्या जातील. पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या या यात्रांची जबाबदारी राज्यातील वरिष्ठ नेत्यांकडे सोपवली जाईल.

सर्व दौऱ्यांची सांगता लखनौ येथील एका भव्य सभेने होईल, जिथे पंतप्रधान नरेंद्र मोदी संबोधित करतील अशी अपेक्षा आहे. याशिवाय, सर्व राज्य मंत्र्यांना जिल्हे नेमून देण्यात आले असून ते प्रत्येक जिल्ह्यातील भाजपच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांना भेटतील. कार्यकर्ते प्रथम या वचनबद्धतेने ही मोहीम पुढे जाईल आणि या बैठकांदरम्यान, या कार्यकर्त्यांकडून संघटना आणि सरकारबद्दलचा अभिप्राय गोळा केला जाईल. या अभिप्रायाच्या आधारावर तिकीट वितरण केले जाईल. विशेष म्हणजे प्रत्येक जिल्ह्यात युट्युबर्स आणि इतर सोशल मीडिया क्रिएटर्सना ओळखले जाईल. त्यानंतर पक्ष आपली कामगिरी जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी या प्रभावकांचा वापर करेल.

राज्यात यापुढे आठ तासांचा कामाचा दिवस, आठवड्याला ४८ तासांची मर्यादा



मुंबई (प्रतिनिधी)– कामगारांच्या वेतनाचे संरक्षण, कामाचे तास आणि वेतन कपातीसंदर्भात एकसमान कार्यपद्धती निश्चित करणारे 'महाराष्ट्र वेतन नियम, २०२६' राज्य सरकारने लागू केले आहेत. त्यानुसार सामान्य कामकाजाचा दिवस आठ तासांचा असेल, तर अन्य वेतन कालावधी असलेल्या कर्मचाऱ्यांचे काम आठवड्याला ४८ तासांपेक्षा अधिक असणार नाही. साप्ताहिक विश्रांती, अतिकालिक कामाचे वेतन, वेतन कपातीवरील मर्यादा आणि वेतनाच्या नोंदी ठेवण्याबाबतही नियमांत तरतुदी करण्यात आल्या आहेत. या नियमांमुळे कामगारांच्या वेतन संरक्षणाला बळ मिळेल, अशी माहिती कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी दिली.

वेतन संहिता, २०१९ अंतर्गत हे नियम तयार करण्यात आले आहेत. त्याद्वारे महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ आणि महाराष्ट्र वेतन प्रदान नियम, १९६३ अधिक्रमित करण्यात आले आहेत. मात्र, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे किमान वेतन निश्चित करण्यासाठी या नियमांची अंम लबजावणी होणार नाही. वेतन संहितेच्या कक्षेत येणाऱ्या आस्थापनांतील कर्मचाऱ्यांना हे नियम लागू असतील. नव्या नियमांनुसार वेतनाच्या प्रमाणित व्याख्येत मूळ वेतन, महागाई भत्ता आणि रिटेनिंग भत्त्याचा समावेश करण्यात आला आहे. वेतनातून वगळलेल्या भत्त्यांचे किंवा अन्य घटकांचे प्रमाण एकूण मोबदल्याच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास, ५० टक्क्यांवरील अतिरिक्त रक्कम वेतनात समाविष्ट केली जाणार आहे. त्यामुळे ग्रॅच्युइटीसह अन्य वैधानिक लाभांची गणना करताना वेतनाचा आधार अधिक स्पष्ट होणार आहे.

राज्य सरकार किमान वेतनाचे दर दैनंदिन आधारावर निश्चित करणार आहे. दैनंदिन वेतनाला आठने भागून तासाचा दर, तर २६ ने गुणून मासिक वेतनाचा दर निश्चित केला जाईल. कामाच्या स्वरूपानुसार अतिकुशल, कुशल, अर्धकुशल आणि अकुशल अशा श्रेणींमध्ये व्यवसायांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. परिवर्तनीय महागाई भत्त्यात वर्षातून दोनदा सुधारणा केली जाणार आहे. भारत सरकारच्या श्रम ब्युरोने प्रसिद्ध केलेल्या औद्योगिक कामगारांच्या सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आधारे दरवर्षी १ एप्रिल आणि १ ऑक्टोबरपूर्वी या भत्त्याची गणना केली जाईल.

टी.सी. हरवली

माझी **कामिनी विलासराव देशमुख** या नावाची बी.एसस्सी.पासची टी.सी. नांदेड ते बारड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

संपर्क पत्ता– कामिनी विलासराव देशमुख
रा. बारड ता. मुदखेड जि. नांदेड

सनद हरवली

माझी **श्रद्धा गोविंद बोबडे** या नावाची बारावी पासची सनद बसस्टँड ते वजिराबाद आटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

संपर्क पत्ता –श्रद्धा गोविंद बोबडे रा. धनगरवाडी
पोस्ट विष्णुपूरी ता.जि. नांदेड मो.नं. ९४२००३७५८०

जिल्हा परिषद ,नांदेड.
जि.प.बांधकाम विभाग नांदेड

फोन नं.-०२४६२-२३४०१२
वेबसाईट- www.zpnanded.in
ई मेल –worksdivzpnanded@gmail.com
विभाग –नियोजन
जाक्र/जिपनां/ बांविन/ नियोजन/निविदा/ 892 /२०२६
दिनांक - 13/11/2026

जिल्हा परिषद नांदेड
जिल्हा परिषद,बांधकाम विभाग नांदेड यांचे कार्यालय
ई- निविदा सूचना क्र. 27 सन 2026 -2027

जिल्हा परिषद,बांधकाम विभाग नांदेड अंतर्गत ई निविदा सूचना क्रमांक 27 जिल्हा परिषद पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खुला कंत्राटदार साठी 3 , मजूर सहकारी संस्था 2, सुशिक्षित बेरोजगार अभियंता 6,ईलेक्ट्रीकल कंत्राटदार (खुला) 4 असे एकूण 15 कामाची नमुन्यातील निविदा निविदा सूचना क्रमांक 27 जिल्हा परिषदेसाठी पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत.निविदा संबंधी सर्व आवश्यक कागदपत्र,निविदा सूचना जाहिरात व निविदा अटी शर्थी शासनाच्या https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निविदा समिती जि.प. नांदेड यांनी राखून ठेवला आहे

कार्यकारी अभियंता
जिल्हा परिषद,बांध.विभाग नांदेड

'एफडीए'ची कारवाई; १.२७ कोटींचा अन्नसाठा जप्त, १२ परवाने निलंबित व ६ व्यवसाय बंद

मुंबई (प्रतिनिधी)– अन्न व औषध प्रशासनाने महाराष्ट्रात अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर बडगा उगारला है. प्रशासनाने राज्यभरात मोठी धडक कारवाई करत तब्बल १.२७ कोटी रुपयांचा अयोग्य व असुरक्षित अन्नसाठा जप्त केला आहे. या मोहिमेत एकूण १२ नामांकित आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून ६ विक्रेत्यांचे व्यवसाय बंद करण्यात आले आहेत. याशिवाय, राज्यात १.६८ लाखांचा प्रतिबंधित तंबाखू व गुटखा साठा जप्त करून ५ जणांना अटक करण्यात आली आहे.

शालार्थ आयडी घोटाळ्यात मालेगावातील हायस्कूलचे मुख्याध्यापक आणि शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांना अटक

मालेगाव (प्रतिनिधी)– उत्तर महाराष्ट्रातील गाजलेल्या व शिक्षण क्षेत्राला हादरवून सोडवणाऱ्या शालार्थ आयडी घोटाळ्याच्या आरोपावरून मालेगाव येथील प्रसिद्ध मालेगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक जाहिद हुसेन मोहम्मद अली (रा. रौनकाबाद) तसेच येथील महात्मा फ ुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुनील वडगे यांना जिल्हा आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेन मंगळवारी अटक केली. अटकपूर्व जामीन अर्ज फ ेटाळण्यात आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

मालेगाव हायस्कूलच्या शिक्षीकाा जैनम मोहंमद, सिमा निहाल दुलार यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. पवारवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात तब्बल पावणेतीन कोटींचा घोटाळा उघडकीस आल्याने हा गुन्हा आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे चौकशीसाठी आला. यात संस्थेचे अध्यक्ष इस्हाक जरीवाला, मुख्याध्यापक जाहिद हुसेन, लिपीक नासीर हुसेन, अबु हुरैरा, मध्यस्थ नवीद सगीर १३ जणांचा समावेश आहे. ८ महिलांसह १२ संशयित फरार आहे. यातील पाच संशयित शिक्षकांना १३ महिन्याचे अटकेनंतर जामीन मंजूर झाला आहे.

तर येथील कर्मवीर या. ना. जाधव विद्यालयात चार कर्मचाऱ्यांची बेकायदेशीर नियुक्ती करून बोगस 'शालार्थ आयडी' तयार केल्याप्रकरणी वडगे यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

जाहीर प्रगटण

मी खालील सही करणार डॉ. सचिन पि. हरीहर हुलसुरे, रा. हनुमान मंदीर जवळ, भोकर ता. भोकर जि. नांदेड या जाहीर प्रगटणाद्वारे सुचित करण्यात येते की मी व माझे इतर भागीदार यांनी मिळून गोविंदलाल मथूराप्रसाद अग्रवाल व सौ. सत्यवती गोविंदलाल अग्रवाल यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील मौजे धनगरवाडी ता.जि. नांदेड येथील शेत गट नं.9 पैकी 66 आर जमीन विकीखत क. 7733 दि.27.06.2024 आधारे विकत घेतली होती.

सदरील मुळ विकीखत व लिंक रजिस्ट्री 11855 दि.28.11.2023 व लिंक दस्त बक्षीसपत्र क.11042 दि.31.10.2011 असे ओरीजीनल विकीखत घेवून मी वजिराबाद ते रजिस्ट्री ऑफीसकडे जात असतांना सदरील पिशवी गहाळ झाली व त्यामध्ये असेलेले मुळ विकीखत व बक्षीसपत्रही गहाळ झाले आहेत. मी माझ्या परीने सदरील मुळ दस्तांचा शोध घेतला असता ते दस्त मिळून आले नाही.

येणे प्रमाणे चतुर्सिमेच्या आतील शेतजमीन विकत घेतली आहे व नंतर विकी केली आहे. परंतू वर नमूद केलले मुळ विकीखत व बक्षीसपत्र गहाळ झाले आहे व कोणास ते मुळ विकीखत व बक्षीसपत्र मिळाल्यास खालील पत्यावर आणून देण्याची विनंती आहे. .

करीता हे जाहीर प्रगटण

प्रगटण देणार

डॉ. सचिन पि. हरीहर हुलसुरे,
रा. हनुमान मंदीर जवळ, भोकर ता. भोकर
जि. नांदेड

Change In Name

My old name is **CHAUDANTE PRANITA MAROTRAO** which I am changing as New Name **PRANITA MAROTIRAOCHOUDANTE**. Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same.

ADDRESS - 1-2-298-1 Main Road Shravasti Nagar Nanded 431602

Change In Name

My old name is **CHAUDANTE MAROTRAO** which I am changing as New Name **MOROTI MARIBAJI CHOUDANTE.** Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same.

ADDRESS - 1-2-298-1 Main Road Shravasti Nagar Nanded 431602

जाहीरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर , ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४० / २०२६ पुढील तारीख – २०.११.२०२६

अर्जदार :
०१. सुगीत्रा भ्र. भुमन्ना टोकलवार , वय – २९ वर्षे, व्यवसाय –घरकाम ,
०२. शंकर पि. भुमन्ना टोकलवार ,वय – २५ वर्षे, व्यवसाय–शेती
०३. माधव भुमन्ना टोकलवार ,वय – ११ वर्षे,(अज्ञान) व्यवसाय–शिक्षण
०४. निळकंठ पि. भुमन्ना टोकलवार ,वय – ०५ वर्षे, (अज्ञान) व्यवसाय–निरंक
अर्जदार क्र १ ते ४ रा. मचनूर ता.बिलोली जि. नांदेड
०५. सावित्रा भ्र. दत्ता कन्नेवाड ,वय – २८ वर्षे, व्यवसाय–शेती
रा. घर नं. १–१७६ जावला बु मंडल जावला खुर्द जि. आदिलाबाद राज्य तेलंगणा
०६. नागमणी भ्र भुमा टोकलवार, वय – २१ वर्षे, व्यवसाय–घरकाम
(नागमणी भ्र. सतीश शेवाटकर) रा. असापूर टेकडा नांदेड
०७. पार्वती भ्र.सय्याना बोई , वय – २५ वर्षे, व्यवसाय–घरकाम
रा. कुंडलवाडी ता.बिलोली जि. नांदेड

विरुध्द.

गैरअर्जदार: १. सहकारी मध्यवर्ती बँक नांदेड तर्फे शाखाधिकारी कुंडलवाडी
ता.बिलोली जि. नांदेड

विषय– भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे अर्ज ..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, **मयत माधाबाई भ्र. भुमन्ना टोकलवार** यांचे अर्जदार क्र १ ते ७ हे कायदेशीर वारस आहेत. **मयत माधाबाई भ्र. भुमन्ना टोकलवार हे मचनुर ता.बिलोली जि.नांदेड येथील रहिवासी होते त्यांच्या मृत्यू दिनांक १०/०७/२०११ रोजी मचनूर येथे झाला.** अर्जदार हयांना **मयत माधाबाई भ्र. भुमन्ना टोकलवार** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

Branch Name	Sr No.	Account No.	Sum assured on maturity
सहकारी मध्यवर्ती बँक नांदेड तर्फे शाखाधिकारी कुंडलवाडी ता.बिलोली जि. नांदेड	1.	11431000701630	Rs. 51,931.14/-

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर **मयत माधाबाई भ्र. भुमन्ना टोकलवार** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर **मयत माधाबाई भ्र. भुमन्ना टोकलवार** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर **मयत माधाबाई भ्र. भुमन्ना टोकलवार** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर **मयत माधाबाई भ्र. भुमन्ना टोकलवार** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७ / ११ /२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन,

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली

सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली

Public Notice

By this public notice it is bring to public at large knowledge that I Dr. Sachin Harihar Hulsure, R/o. Near Hanuman Mandir, Bhokar Tq. Bhokar Dist. Nanded.

That I along with my partners have purchased 0H 66R land out of land gut No.9 of village Dhangarwadi Nanded. The said land was purchased by us vide registered sale deed No. 7733 dated 27.06.2024.

That I have kept original sale deed No.7733 dated 27.6.2024 along with link sale deed no. 11855 dated 28.11.2023 and link document i.e. gift deed No.11042 dated 31.10.2011 in one bag .

That during traveling the said original sale deed and link sale deed was misplaced. I have tried by level best to search out original sale deed and gift deed. But I have not found original sale deed and gift deed.

Hence this paper notice

Dr. Sachin Harihar Hulsure,
R/o. Near Hanuman Mandir,
Bhokar Tq. Bhokar
Dist. Nanded.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड
ई-निविदा सुचना क्र.११ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बाधकाम विभाग, भोकर जि.नादेड (दुरध्वनी क्रमांक ०२४६७-२२२६५८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बाधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण ३० कामांकरीता बी-१ नमुन्यातील ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

टीप- १) निविदा कागदपत्राचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२) सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर
जि.नांदेड

Change In Name

My old Name is **SYED IBRAHIM SYED ASLAM**. Which now I am Changing as New Name **SAYYAD IBRAHIM** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: H.NO.1-23-155, ASLAM KIRANA, ASRA NAGAR, SANGVI BK, TARODA BK, NANDED-431605
Mob: 9130815359



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

शिवानी दीदींच्या 'खुशनुमा जीवन जीने की कला' कार्यक्रमाला नांदेडकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

हजारो नागरिकांची उपस्थिती; सकारात्मक जीवनाचा दिला प्रेरणादायी संदेश

नांदेड (प्रतिनिधी) –आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैली-मध्ये प्रत्येक व्यक्तीला आनंदी, समाधानी आणि प्रसन्न जीवन जगण्याची कला आत्मसात करण्याची गरज आहे. जीवनातील प्रत्येक परिस्थितीला सकारात्मक दृष्टिकोनातून सामोरे जात मनःशांती आणि आत्मिक समाधान मिळविण्याचा मार्ग आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या आध्यात्मिक व प्रेरणादायी वक्त्या बीके शिवानी दीदी यांनी आपल्या ओघवत्या शैलीतून उपस्थितांना समजावून सांगितला.

ब्रह्माकुमारीज नांदेड यांच्यावतीने १७ नोव्हेंबर २०२६ रोजी नवा मोंढा मैदान, नांदेड येथे 'खुशनुमा जीवन जीने की कला' या विषयावर प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय कैलासनगर नांदेड सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी शिवकन्या दीदी यांच्या विशेष प्रयत्नातून व मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी गेल्या सात वर्षांपासून सतत ब्रह्माकुमारी शिवानी दिदी यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला होता. या कार्यक्रमाला नांदेड शहर व जिल्ह्यातील तब्बल २५ हजारांहून



अधिक नागरिकांनी उपस्थिती लावून उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, माजी मंत्री डी. पी. सावंत, खा. रवींद्र चव्हाण, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, महापौर कविता मुळे, गोदावरी अर्बन बँकेच्या अध्यक्षा राजश्री पाटील, महेश कनकदंडे, किशोर स्वामी, संजय लहानकर, गुरुद्वारा बोर्डाचे सचिव रवींद्रसिंग बुंगई, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, गोविंद गुरू यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बीके शिवानी दीदी यांनी मानवी जीवनातील मानसिक ताणतणाव, राग, चिंता, नकारात्मक विचार, कौटुंबिक समस्या आणि नातेसंबंधांमधील दुरावा यावर अत्यंत सोप्या व प्रभावी पद्धतीने मार्गदर्शन केले. आपल्या जीवनातील प्रत्येक परिस्थिती आपल्या नियंत्रणात नसली तरी त्या परिस्थितीला आपण कशा पद्धतीने प्रतिसाद द्यायचा, हे आपल्या हातात असते. त्यामुळे स्वतःच्या विचारांवर नियंत्रण ठेवणे, सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारणे आणि मन शांत ठेवणे आवश्यक आहे, असा संदेश त्यांनी दिला.

आज माणूस भौतिक सुखसोयींच्या मागे धावत असताना मानसिक समाधान आणि आनंदापासून दूर जात आहे. खरा आनंद हा बाह्य परिस्थितीत नसून आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आहे. स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्यास कुटुंब, समाज आणि संपूर्ण जीवनात आनंदाचे वातावरण निर्माण होऊ शकते, असेही त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या ठिकाणी भव्य व्यासपीठ, आकर्षक सजावट आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण करण्यात आले होते. शिवानी दीदींचे विचार ऐकण्यासाठी महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. ब्रह्माकुमारीज नांदेड यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला मिळालेला नागरिकांचा प्रतिसाद हा नांदेडच्या सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला. आनंदी जीवन, सकारात्मक विचार आणि तणावमुक्त समाजनिर्मितीचा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनमानसापर्यंत पोहोचला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीके शिवकन्या दीदी यांनी केले.

शासकीय रुग्णालयात रक्ताचा तुटवडा; रुग्णांची हेळसांड, नातेवाईकांची गैरसोय

ब्लड बँक प्रमुख 'नॉट रिचेबल'

नांदेड (प्रतिनिधी)–शहरापासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या विष्णुपुरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील शासकीय रक्तपेढीमध्ये मागील काही दिवसांपासून रक्ताचा पुरवठा योग्य रीतीने होत नसल्याने तेथे दाखल असलेल्या रुग्णांचा जीव टांगणीला लागला आहे. नातेवाईकांची रक्त मिळविण्यासाठी धावपळ होत आहे.

मागील काही दिवसांपासून या रुग्णालयातील ब्लड बँकेने नांदेड जिल्ह्यात कुठेही ब्लड कॅम्प घेतला नसल्याने रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. येणाऱ्या काळात अशीच परिस्थिती राहिली, तर रुग्णालयातील गंभीर रुग्णांना आपला प्राण गमवावा लागतो की काय, अशी भीती निर्माण होत आहे.

अगोदरच शहरापासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या या रुग्णालयात बाहेरगावाहून आलेल्या नातेवाईकांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत आहे. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडून रुग्णांच्या नातेवाईकांना सापत्न वागणूक दिली जात असून, अरेरावीची भाषा वापरली जात आहे. गोरगरीब रुग्ण आपल्या नातेवाईकांसह रुग्णालयात दाखल झाल्यानंतर नातेवाईकांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

शासकीय ब्लड बँकेमध्ये आजघडीला रक्ताची कमतरता जाणवत आहे. सर्वच रक्तगटातील रक्तपिशव्या मिळविण्यासाठी रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना पायपीट करून शहरात येऊन ब्लड बँकेच्या लोकांशी विनवणी करावी लागते. त्या बदल्यात त्यांना स्वतः रक्त द्यावे लागते आणि आर्थिक रक्कमही मोजावी लागत आहे.

विशेष म्हणजे ब्लड कॅम्प घेणे अत्यंत आवश्यक असताना ब्लड बँकेचे प्रमुख कार्यरत असूनही ब्लड बँकेत उपलब्ध होत नाहीत किंवा कुठल्याही भ्रमणध्वनीला ते उत्तर देत नाहीत. यामुळे गोरगरीब व अशिक्षित रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

वैद्यकीय अधीक्षक आणि रुग्णालयाचे अधिष्ठाता तसेच विभाग प्रमुख यांनी आपापल्या अधीनस्थ कर्मचाऱ्यांकडून व्यवस्थित रुग्णसेवा करून घेतल्यास रुग्णालयाचे नाव रोशन होण्यास वेळ लागणार नाही.

असाच प्रकार मागील दोन वर्षांपूर्वी याच रुग्णालयात घडला होता. अनेक रुग्णांना व बालकांना औषधाविना आपला प्राण गमवावा लागला होता. आजघडीला औषधांचा पुरवठा योग्य असला तरी ब्लड बँकेत मात्र रक्ताचा ठणठणाट पाहायला मिळत आहे. तेथील कर्मचारीही रुग्णांच्या नातेवाईकांना उद्धट वागणूक देतात. एवढेच नाही तर त्यांचे बोलणेही ऐकून घेत नाहीत. कर्मचाऱ्यांचा हा मुजोरपणा रुग्णालयाला बदनाम करण्याचे काम करू शकतो.

यासाठी अधिष्ठाता आणि वैद्यकीय अधीक्षक यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष घालून रुग्णालयाचे नाव खराब होऊ नये व रुग्णांना योग्य आरोग्य सेवा मिळावी यासाठी संबंधित तज्ज्ञ डॉक्टरांना व अन्य कर्मचाऱ्यांना समज द्यावी, अशी मागणी रुग्णांच्या नातेवाईकांमधून पुढे येत आहे. या रुग्णालयाकडे अधिष्ठाता आणि स्थानिक आमदार यांनी लक्ष घातल्यास रुग्णांच्या नातेवाईकांची गैरसोय टळणार आहे.

पोलीस उपमहासंचालक मधुकर पांडे यांची ग्रामीण पोलीस स्टेशनला भेट



नवीन नांदेड (प्रतिनिधी)– राज्याचे पोलीस उपमहासंचालक मधुकर पांडे यांनी ग्रामीण भेट दिली. यावेळी त्यांनी पोलीस स्टेशनची पूर्ण पाहणी करून कामकाजाची माहिती घेतली. पोलीस स्टेशन व परिसरातील स्वच्छतेबाबत समाधान व्यक्त केले.

बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी राज्याचे पोलीस उपमहासंचालक मधुकर पांडे हे नांदेड जिल्हा दोन दिवसीय दौरा संदर्भाने आगमन झाले. या भेटीच्या वेळी नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहित, अप्पर पोलीस अधीक्षक संदीप जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक अशोक जाधव, सहायक पोलीस निरीक्षक मंगेश नाईक, वसंत मुळे, रेखा काळे यांच्यासह उपनिरीक्षक व पोलीस अंमलदार उपस्थित होते.

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी राज्याचे पोलीस उपमहासंचालक मधुकर पांडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी पोलीस स्टेशनची पाहणी, मुद्देमाल, गुन्हेविषयक माहिती घेऊन स्वच्छतेबाबत समाधान व्यक्त केले.

नांदेड जिल्हा खो-खो निवड चाचणी क्रीडा स्पर्धा

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनतर्फे दि. २८ नोव्हेंबर २०२६ ते ०१ डिसेंबर २०२६ या कालावधीमध्ये जिल्हा अहिल्यानगर येथे महिला/पुरुष (ओपन गट) राज्यस्तरीय खो-खो क्रीडा स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी नांदेड जिल्ह्याच्या संघाची निवड रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल सिडको नांदेड येथे सकाळी ठीक अकरा वाजता नांदेड जिल्हा खो खो निवड चाचणी क्रीडा स्पर्धा होणार आहेत.

१४ वर्षाखालील मुले व मुली डिसेंबर महिन्यामध्ये परभणी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय खो खो क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खेळाडूंनी खो-खो क्रीडाप्रेमींनी सहभाग घ्यावा, असे आवाहन नांदेड जिल्हा खो खो असोसिएशनचे अध्यक्ष माजी मंत्री टी. पी. सावंत जे. ई. गोपिले, रघुनाथ शिंदे, सचिव प्रा. डॉ. रमेश नांदेडकर (८८३०४४४७१५) यांनी केले आहे.

नांदेड-बिदर रेल्वे मार्गासाठी आ. श्रीजया चव्हाण यांचे कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना साकडे

नांदेड (प्रतिनिधी)– बंगळुरू येथे सुरू असलेल्या 'कॉमनवेल्थ महिला संसद सदस्य परिषदे'च्या निमित्ताने भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ. श्रीजया चव्हाण यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांची भेट घेऊन नांदेड-बिदर रेल्वे मार्गाला कर्नाटक राज्य सरकारने मंजुरी द्यावी, असे साकडे घातले.

या परिषदेत सहभागी झालेल्या महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळात आ. श्रीजया चव्हाण यांचा समावेश आहे. यानिमित्ताने त्यांना कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी स्नेहभोजनासाठी निमंत्रित केले होते. याप्रसंगी झालेल्या चर्चेत आ. चव्हाण यांनी नांदेड-बिदर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला कर्नाटक राज्य सरकारकडून आवश्यक असलेल्या परवानग्या आणि प्रकल्पातील त्यांच्या हिश्याच्या खर्चास मंजुरी द्यावी, अशी मागणी केली.



नांदेड-बिदर रेल्वे मार्गाला केंद्र सरकारने मान्यता दिली असून, केंद्र व राज्य सरकारच्या ५०-५० टक्के आर्थिक सहभागातून हा प्रकल्प उभारला जाणार आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील भाजपा महायुती सरकारने या प्रकल्पास मान्यता देऊन आपल्या वाट्याचा खर्च उचलण्याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित केला आहे. मात्र, अद्याप कर्नाटक राज्य सरकारने संबंधित अनुमती दिलेली नसल्याने प्रकल्प रेंगाळला आहे.

या प्रकल्पाला कर्नाटक राज्य सरकारने मंजुरी द्यावी, यासाठी राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी संसदेसह कर्नाटक शासनाकडे पाठपुरावा केला आहे. मात्र, अद्यापही त्यावर निर्णय झालेला नाही. नांदेड व बिदर ही शीख समाजाची दोन महत्त्वपूर्ण तीर्थस्थळे या प्रकल्पाने जोडली जाणार आहेत. त्यामुळे याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी आ. श्रीजया चव्हाण यांनी मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्याकडे केली. त्यावर लवकरच विचार करू, असे आश्वासन शिवकुमार यांनी दिल्याचे आ. चव्हाण यांनी म्हटले आहे.

खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत मॅरेथॉन आढावा बैठक

दुष्काळजन्य परिस्थितीत ऑगस्ट २०२७ पर्यंत अखंडित पाणीपुरवठा नियोजन आणि प्रलंबित विकासकामांबाबत सक्त निर्देश

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रलंबित विकासकामे जलदगतीने पूर्ण व्हावीत आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा तात्काळ निपटारा व्हावा तसेच जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या 'अल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा संपूर्ण महाराष्ट्रासह नांदेड जिल्ह्यातही सरासरीपेक्षा अत्यंत कमी पाऊस झाला आहे. या तीव्र दुष्काळी परिस्थितीमुळे उपलब्ध असलेला मर्यादित जलसाठा अत्यंत काटकसरीने वापरून पुढील ऑगस्ट २०२७ पर्यंत संपूर्ण नांदेड शहराला अखंडित पाणीपुरवठा करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे.

पाण्याचे गंभीर संकट ओळखून यासाठी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि.१८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता महानगरपालिका कार्यालयात



एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत दुष्काळजन्य परिस्थितीत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याचे नियोजन, शहरातील रस्ते, स्वच्छता, आणि वाहतूक कोंडी यांसारख्या विविध ज्वलंत मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व अधिकाऱ्यांना सक्त निर्देश देण्यात आले.

या बैठकीला महापौर सौ. कविता मुळे, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दीपकसिंह रावत, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, उसभापती निरंजना लांडगे, सभागृह नेता अॅड. महेश कनकदंडे, माजी सभापती किशोर स्वामी, संतोष मुळे यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी, अभियंता, विविध प्रभागातील नगरसेवक आणि शहरातील विविध भागांतून आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सद्यस्थितीत विष्णुपुरी धरण व इतर ठिकाणी शहरासाठी राखीव असलेल्या पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती सादर केली त्याचप्रमाणे पाणी पुरवठा विभागाने गेल्या एक ते दोन महिन्यात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर केला. पाणी पुरवठा विभागाने मागील काही कालावधीत शहरातील अवैध पाणी वापर रोखण्यासाठी १८७ अनधिकृत नळ जोडण्या खंडित केल्या आहेत. त्याचप्रमाणे पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी तातडीने २८६ ठिकाणी गळती दुरुस्ती करण्यात आली आहे.

नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करावे आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा, असे स्पष्ट निर्देश खा. अशोकराव चव्हाण यांनी बैठकीच्या समारोपाप्रसंगी दिले.

बाबूराजा सारडा यांचे निधन



उमरी (प्रतिनिधी)– नगर परिषद उमरीचे माजी नगराध्यक्ष प्रवीण सारडा यांचे वडील बाबूराजा बंकटलाल सारडा यांचे बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी उमरी वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी नगराध्यक्ष प्रवीण सारडा, विनोद सारडा, अतुल सारडा यांचे ते वडील होत.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा सलग दुसऱ्या दिवशीही बेमुदत संप; हदगाव न्यायालयाचे कामकाज ठप्प

हदगाव (प्रतिनिधी)– न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवार, दि. १७ नोव्हेंबरपासून सुरू केलेला बेमुदत संप बुधवारी सलग दुसऱ्या दिवशीही सुरूच राहिला. हदगाव येथील न्यायालयातील कर्मचारीही या आंदोलनात सहभागी झाले असून, न्यायालयाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या देत निषेध नोंदविला. त्यामुळे न्यायालयातील प्रशासकीय व कार्यालयीन काम काजावर परिणाम झाला आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी यापूर्वीही टप्प्याटप्प्याने आंदोलने केली आहेत. १६ सप्टेंबर तसेच १६ व १७ ऑक्टोबर



रोजी काळ्या फिती लावून निषेध नोंदविण्यात आला होता. त्यानंतर १७ ऑक्टोबर रोजी सेवारत न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी कार्यालयांसमोर धरणे आंदोलन केले होते. तसेच ५ नोव्हेंबर रोजी सामुदायिक रजा आंदोलन पुकारण्यात आले होते. मात्र, तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी हे आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, या सर्व आंदोलनांनंतरही कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने अखेर मंगळवार, १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप सुरू करण्यात आला आहे. समान काम-समान वेतन, सुधारित वेतनश्रेणी, वेतनातील तफावत दूर करणे तसेच अन्य प्रलंबित मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. बुधवारी सलग दुसऱ्या दिवशीही हदगाव न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी काम बंद ठेवून प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले.

कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्याकडून हिवाळी परीक्षेच्या केंद्रांची पाहणी

नांदेड (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या हिवाळी परीक्षा २०२६ च्या अनुषंगाने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांनी विद्यापीठाशी संलग्नित पाच महाविद्यालयांतील परीक्षा केंद्रांना आज अचानक भेट देऊन परीक्षा व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली.

या दौऱ्यामध्ये ग्रामीण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वसंतनगर (कोट्ग्याळ), श्री संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोहा, श्री शिवाजी महाविद्यालय कंधार, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय मुखेड आणि शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय मुखेड या परीक्षा केंद्रांची पाहणी



करण्यात आली.

या पाहणी दरम्यान कुलगुरूंनी परीक्षा कक्षांमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था, ऑनलाईन प्रश्नपत्रिका डाउनलोड करण्याची प्रक्रिया, उत्तरपत्रिकांचे संकलन व सीलबंद करण्याची कार्यपद्धती तसेच परीक्षेच्या सुरळीत संचालनासाठी आवश्यक असलेल्या इतर सुविधांची तपासणी केली.

ज्या परीक्षा केंद्रांवर परीक्षा कक्षांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, त्या महाविद्यालयांनी त्याच दिवशी आवश्यक ती व्यवस्था पूर्ण करावी, असे सुस्पष्ट निर्देश कुलगुरूंनी दिले. या त्रुटींचे तातडीने निराकरण न झाल्यास संबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com